



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १५७ * नांदेड * शनिवार, दि. १३ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# बंगाल निवडणुकीत वापरलेले ४ हजार ईव्हीएम जळून खाक

## सरकारी इमारतीला आग, घातपाताचा संशय



**कोलकाता (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील एका नऊ मजली सरकारी इमारतीला लागलेल्या भीषण आगीत तब्बल ४००० ईव्हीएम जळून खाक झाल्या आहेत. या ईव्हीएम विधानसभा निवडणुकीत वापरण्यात आल्या होत्या. या घटनेनंतर राजकीय वातावरणात आरोप-प्रत्यारोपांना उधाण आलं असून, प्रशासनानं या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

दक्षिण कोलकात्याच्या अलीपूर भागात असलेल्या एका सरकारी इमारतीला आग लागली होती. ही आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांना तब्बल २४ तासांपेक्षा जास्त वेळ लागला.

ज्या नऊ मजली इमारतीला आग लागली, त्यामध्ये इतर सरकारी विभागांशिवाय दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचं कार्यालय देखील भक्ष्यस्थानी पडलं. बंगाल सरकारमधील अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा राज्यमंत्री कौशिक चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या आगीत सुमारे ४,००० ईव्हीएम पूर्णपणे नष्ट झाल्या आहेत.

विशेष म्हणजे, या जळालेल्या ईव्हीएम मशिन्सचा वापर नुकत्याच राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांदरम्यान १० वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये करण्यात आला होता. या मशिन्स तिथे सुरक्षेसाठी ठेवण्यात आल्या होत्या.

घटनेची माहिती मिळताच राज्यमंत्री कौशिक चौधरी यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या अपघातावर मोठा संशय व्यक्त केला. ही कोणतीही सामान्य आग वाटत नाही. यामध्ये काही घातपात किंवा तोडफोड झाली आहे का, याचा आम्ही सखोल तपास करत आहोत. आग सर्वात आधी इमारतीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर लागली होती, मग ती थेट नवव्या आणि दहाव्या मजल्यापर्यंत कशी पोहोचली, हे अद्याप अस्पष्ट आहे, असं चौधरी यांनी म्हटलं.

बुधवारी लागलेल्या या भीषण आगीच्या ज्वाळा गुरुवारी सकाळपर्यंत शांत झाल्या होत्या. खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवान अजूनही घटनास्थळी तैनात असून, इमारतीमध्ये कूलिंगची प्रक्रिया राबवली जात आहे.

# मान्सूनसाठी धोक्याची घंटा, भारतावर दुष्काळाचे सावट?

## १९५० नंतरचा सर्वात भीषण एल निनो सक्रिय; अमेरिकी हवामान संस्थेची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा सीपीसी अर्थात क्लायमेट प्रेडीक्शन सेंटरने केली आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र 'एल निनो' राहण्याचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असा अंदाज देखील आहे. २०२७ च्या पूर्वार्धातही 'एल निनो' सक्रिय असेल असा कयास बांधला जात आहे.

प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती जाऊन एल निनो निर्माण झाल्याची घोषणा अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन (सीपीसी) सेंटरने केली. डिसेंबरपर्यंत एल निनोची तीव्रता अतितीव्र स्वरूपाची होणार असून, यंदाचा एल निनो १९५० पासूनच्या नोंदींमधील सर्वाधिक तीव्र ठरण्याची शक्यता सीपीसीने वर्तवली आहे. सीपीसीने गुरुवारी जारी केलेल्या अंदाजानुसार, गेल्या महिनाभरात एल निनोची स्थिती विकसित झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यंदाचा एल निनो फेब्रुवारी २०२७ मध्येही सक्रिय राहण्याची शक्यता ९० टक्क्यांहून जास्त असल्याचे सीपीसीच्या अंदाजात



म्हटले आहे.

यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र असा एल निनो राहण्याचा अंदाज वर्तवला जातोय. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असाही अंदाज असेल, २०२७ च्या पूर्वार्धातही एलनेनो सक्रिय असेल असा कयास बांधला जातोय आणि अर्थातच या एल निनोचा मोठा परिणाम हा मान्सूनवर होतोय आणि त्यामुळे महाराष्ट्राला देखील त्याचा फटका बसू शकतो, सरासरी पेक्षा यंदा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे,एल निनोचा प्रभाव वाढतोय, त्याची वाटचाल सुरू झालेली आहे कसे परिणाम होऊ शकतात,एल निनोचे खास करून मान्सूनवर, या प्रश्नावरती माहिती देताना हवामान अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी सांगितलं की, सीपीसीने अधिकृतपणे सांगितलं आपण आधीपासूनच म्हणत होतो की एमनो जून मध्ये सक्रिय होणार पण आता आता गेल्या महिन्याभरातला प्रशांत महासागराच तापमान पाहून सीपीसीने कालच जाहीर केलं की, एल निनो सक्रिय झालेला आहे. याची तीव्रता उत्तरोत्तर वाढत जाणार आहे आणि ते डिसेंबर पर्यंत सर्वाधिक राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

एल निनोचे वेगवेगळे टप्पे असतात, म्हणजे तीव्र, अतितीव्र जसा मध्ये आपण सुपर एल निनो असं पण एक संज्ञा वापरली जात होती. अतितीव्र स्वरूपामध्ये म्हणजे तिथलं तापमान हे सरासरी पेक्षा दोन ते अडीच अंशापर्यंत जास्त राहण्याची शक्यता आहे, बऱ्याच जणांनी सांगितलं होतं की तीन अंशापर्यंत पर्यंत राहू शकत त्या त्यापेक्षा पण जास्त राहू शकत पण सीपीसीच्या अंदाजामध्ये तसं दाखवण्यात आलेल नाही, पण तरी सुद्धा १९५० पासूनचा हा सर्वात तीव्र एल निनो राहण्याची शक्यता आहे जेव्हा तीव्र एल निनो असतो तेव्हा त्याचे परिणाम जगामध्ये ज्या ज्या पद्धतीने असतात, तर ते हमखास होतात असं आतापर्यंतच्या याच्यावरून जे काही नोंदी आहेत त्याच्यावरून दिसून आले.

# लोकसभेच्या जागा ८२४ पर्यंत वाढवा, १७० मतदारसंघांच्या विभाजनाचा प्रस्ताव

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** 'पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने' लोकसभेची सदस्यसंख्या ८२४ जागांपर्यंत वाढवण्याची शिफारस केली आहे. केवळ लोकसंख्येचा विचार न करता मतदारसंघ दोन किंवा तीन भागांत विभागण्यासाठी बहु-घटकीय निकषांचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. लोकसंख्या हा एकमेव निकष न ठेवता मतदानाचा टक्का, मतदारसंघाचा आकार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची लोकसंख्या, भाषिक विविधता आणि ध्रुवीकरण यांसारख्या बहु-घटकीय निकषांचा वापर करून मतदारसंघांचे विभाजन केले जावे, अशी शिफारस करण्यात आली आहे.

लोकसभेच्या जागा वाढवताना मोठ्या राज्यांच्या जागा ५० टक्के वाढवल्या जाव्यात. नवीन मॉडेलनुसार सर्व मोठ्या राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये ५० टक्के वाढ होणार आहे. केरळच्या जागा २० वरून ३०, तामिळनाडूच्या ३९ वरून ५९, तर उत्तर प्रदेशच्या जागा ८० वरून थेट १२० होणार आहे. तर, लहान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जागा दुप्पट करण्याची शिफारस केली गेली आहे.

दक्षिण विरुद्ध उत्तर भारत संतुलन साधण्याचा प्रयत्न देखील करण्यात येणारआहे. या मॉडेलमुळे दक्षिण भारतातील राज्यांचा लोकसभेतील वाटा २३.६ टक्के (सध्या२३.७ टक्के) तर उत्तर भारतातील ६ प्रमुख राज्यांचा वाटा ४५.२ टक्के (सध्या ४५.६%) राहील, ज्यामुळे प्रादेशिक संतुलन राखले जाईल. मतदारसंघांचे योग्य विभाजन केल्यास आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत २.३ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते.

# उद्धव ठाकरे यांनी बोलावली खासदारांची बैठक; खासदार फुटीची पार्श्वभुमी?

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याच्या राजकारणात एकीकडे 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा सुरू असताना, उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाच्या खासदारांची एक महत्त्वाची बैठक बोलावली आहे. १४ जून रोजी ठाकरेंच्या शिवसेनेच्या सर्व खासदारांची 'मातोश्री'वर बैठक बोलावण्यात आली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात काही मोठ्या घडामोडी घडणार आहेत का याची आता चर्चा सुरू झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार फोडण्यात येणार असल्याची चर्चा सातत्याने रंगताना दिसत आहे. त्याच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत आता खासदारांची महत्त्वाची बैठक होणार असल्याने त्याकडे सर्वांचं लक्ष आहे.

ठाकरेंच्या शिवसेनेचे परभणीचे खासदार संजय उर्फ बंडू जाधव हे एकनाथ शिंदेंच्या संपर्कात असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेकडून परभणी जिल्ह्याच्या संघटनेमध्ये काही बदलही करण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून संजय जाधव हे ठाकरेंच्या शिवसेनेच्या बैठकांनाही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे १४ तारखेच्या बैठकीमध्ये ते उपस्थित राहणार का याकडे लक्ष लागलं आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून ठाकरेसेनेतील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा रंगत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत ठाकरे गटातील काही खासदार प्रवेश करणार असल्याचे दावे शिंदे गटातील नेत्यांकडून वेळोवेळी करण्यात आले आहेत.

# कांदा खरेदी दरात सरकारनं केली वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** सरकारने कांदा खरेदीच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. १६.५० रुपये प्रति किलो दरानं कांद्याची खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, सरकारने 'बफर स्टॉक' (राखीव साठा) कार्यक्रमांतर्गत कांदा खरेदीचा दर सध्याच्या १५.८० रुपये प्रति किलोवरून वाढवून १६.५० रुपये प्रति किलो केला आहे. हा नवीन दर शनिवारपासून म्हणजे १३ जूनपासून लागू होईल. देशातील सर्वाधिक कांदा उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी, लागवडीचा वाढलेला खर्च लक्षात घेता ३० रुपये प्रति किलो खरेदी दराची मागणी केली आहे. बाजारातील चढ-उतार नियंत्रित करण्यासाठी (मार्केट इंटरव्हेंशन) 'किंमत स्थिरीकरण निधी' अंतर्गत दरवर्षी हा राखीव साठा (बफर स्टॉक) तयार केला जातो. सरकारने या वर्षासाठी २ लाख टन खरेदीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे, हे प्रमाण मागील वर्षीच्या (२०२५-२६) ३ लाख टन खरेदीच्या तुलनेत कमी आहे.

# १५ जून रोजी नांदेड जिल्ह्यातील शाळेची घंटा वाजणार

- शाळा प्रवेशोत्सवासाठी जिल्हा प्रशासन सज्ज
- पहिल्याच दिवशी अधिकारी-कर्मचारी शाळांना देणार भेटी
- नवोदित विद्यार्थ्यांचे होणार उत्साहात स्वागत



**नांदेड (प्रतिनिधी)–** उन्हाळी सुट्टीनंतर येत्या १५ जूनपासून जिल्ह्यातील शाळा पुन्हा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजणार असून नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि विविध विभागांचे प्रतिनिधी शाळांना भेटी देऊन नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली.

प्रवेशोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, महापालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी जिल्ह्यातील शाळांना भेटी देणार आहेत. यावेळी शाळांमधील भौतिक सुविधा, स्वच्छता, विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधा तसेच शैक्षणिक गुणवत्तेची पाहणी करण्यात येणार आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख १६ हजार पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा परिषद शाळांमधील सुमारे १ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये सुमारे २६ हजार, तर सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये जवळपास ६० हजार नवोदित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये रांगोळ्या, स्वागत कमानी, प्रभातफेरी, फुलांची उधळण तसेच ढोल-ताशांच्या गजरात स्वागत अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय आणि आनंददायी ठरावा यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे.

'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत सर्व शाळांमध्ये वृक्षारोपण करण्यात येणार असून मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या संकल्पनेतील विद्यार्थी आरोग्यदूत या अभिनव उपक्रमालाही प्रारंभ होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आकर्षण व उत्साह निर्माण करणे, शाळेशी त्यांचे भावनिक नाते दृढ करणे आणि शिक्षणाचा आनंददायी अनुभव देणे हा प्रवेशोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे सीईओ मेघना कावली यांनी सांगितले.

# नांदेड जिल्ह्यात २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम

## ३ लाख ८८ हजार ५२६ बालकांना डोस देण्याचे उद्दिष्ट
## जिल्हा टास्क फोर्स व सुकाणू समितीची आढावा बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी २८ जून २०२६ रोजी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या आणि स्टॉप डायरिया कॅम्पेन २०२६ च्या पूर्वतयारीसाठी जिल्हा कार्य बल गट (टास्क फोर्स) व जिल्हा सुकाणू समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.


या बैठकीत राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम शंभर टक्के यशस्वी करणे, ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे



आणि आरोग्य विभागाच्या इतर विविध राष्ट्रीय कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीला जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बुटे यांच्यासह जिल्हा सुकाणू समिती आणि कार्य बल गटाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

बैठकीत आगामी २८ जून रोजी होणाऱ्या पल्स पोलिओ मोहिमेच्या उद्दिष्टांचे अधिकृत सादरीकरण करण्यात आले. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात एकूण ३,८८,५२६ बालकांना पोलिओचा डोस पाजण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये ग्रामीण भागातील २,४८,७२८, शहरी भागातील ४६,९४३ आणि महानगरपालिका (मनपा) क्षेत्रातील ९२,८५५ अपेक्षित लाभार्थ्यांचा समावेश आहे. मोहिमेच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यात चोख नियोजन करण्यात आले आहे.




# मनू भाकरचे प्रशिक्षक जसपाल राणा यांचे निधन

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय नेमबाजी क्षेत्रातील दिग्गज नेमबाज आणि माजी आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचे वयाच्या ४९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे भारतीय क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे.

नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष कालिकेश नारायण सिंह देव यांनी ही माहिती दिली. गुरुवारी रात्री दिल्लीतील मॅक्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

भारतीय पिस्तूल नेमबाजांचे उच्च-कार्यक्षमता प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेले राणा नुकतेच जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या आयएसएसएफ वर्ल्ड कप स्पर्धे



तून परतले होते. मात्र, परतीच्या प्रवासादरम्यान त्यांची प्रकृती बिघडली. दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले, मात्र त्यांची प्रकृती सुधारली नाही. म्युनिक येथे झालेल्या आयएसएसएफ वर्ल्ड कप स्पर्धेतून परतताना जसपाल राणा यांची प्रकृती बिघडली होती.

# इस्लापूर येथे नव्या अपर तहसील कार्यालय स्थापनेचा प्रस्ताव

## नागरिकांकडून १५ दिवसांत हरकती मागविल्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात इस्लापूर येथे नव्याने अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याबाबतची प्रक्रिया सुरू झाली असून, यासंदर्भात शासनाचे पत्र दि. २१ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र शासनाचे सह सचिव यांच्या ११ जून २०२६ च्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी यांनी या प्रस्तावाचे प्रारूप प्रसिद्ध करून त्यावर १५ दिवसांची जाहीर सूचना देण्याचे निर्देश दिले आहेत.

प्रस्तावानुसार नव्याने स्थापन होणाऱ्या अप्पर तहसिल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात इस्लापूर, जलधारा आणि शिवणी मंडळांचा समावेश करण्यात येणार आहे. सध्या ही मंडळे तहसिल कार्यालय किनवट अंतर्गत कार्यरत आहेत.

या प्रस्तावाबाबत संबंधित नागरिकांना काही हरकत अथवा उजर असल्यास, त्यांनी ही हरकत बातमी प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट येथे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. असे सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# राज्यातील महिला शेतकऱ्यांना मिळणार वैधानिक 'शेतकरी' दर्जा

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी मुंबई येथील वर्षा निवासस्थानी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६' संदर्भात बैठक पार पडली. राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे.

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी' स्थापन करणे, विधेयकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीची यंत्रणा यांचा देखील अभ्यास केला जावा. जिल्हा आणि तालुका व गावस्तरापर्यंत मजबूत यंत्रणा असली पाहिजे. या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती असावी जेणेकरून या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमित परीक्षण केले जाऊ शकेल.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# संवाद, विसंवाद आणि कुसंवाद

आजचा काळ माहितीचा, तंत्रज्ञानाचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा मानला जातो. जग एका क्लिकवर आले आहे, संवादाची साधने अमर्याद झाली आहेत आणि माणूस पूर्वीपेक्षा अधिक जोडला गेला आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. मात्र या सगळ्या प्रगतीच्या गर्जनेत एक भयावह वास्तव शांतपणे वाढत आहे की माणूस संवाद साधत असला तरी तो एकमेकांना समजून घेण्याची क्षमता हरवत चालला आहे. म्हणूनच आजच्या युगाला गैरसमजांचे युग म्हटले, तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही. मोबाईल, सोशल मीडिया, व्हीडीओ कॉल, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध डिजिटल माध्यमांमुळे संवाद झपाट्याने वाढला. पण संवादाची संख्या वाढली म्हणून समज वाढलीच असे नाही. उलट आज माणूस ऐकतो अधिक, पण समजून घेत नाही; बोलतो अधिक, पण विचार करत नाही. प्रत्येकजण स्वतःचे मत मांडण्यात इतका व्यस्त आहे की दुसऱ्याच्या भावना, विचार किंवा अनुभव समजून घेण्याची तयारी कमी होत आहे. परिणामी समाजात गैरसमज, संशय, पूर्वग्रह आणि भावनिक संघर्ष यांचे प्रमाण वाढत चालले आहे. या संकटाचे मूळ ऐकण्याची हरवलेली सवय आहे. पूर्वी संवाद म्हणजे केवळ बोलणे नव्हते; त्यात संयमाने ऐकणे, विचार करणे आणि समोरच्याला समजून घेणे यालाही महत्त्व होते. आज परिस्थिती उलटी झाली आहे. समोरचा बोलत असतानाच आपले उत्तर काय द्यायचे, प्रतिवाद कसा करायचा किंवा स्वतःचे मत कसे सिद्ध करायचे याचाच विचार सुरू असतो. त्यामुळे संवाद हा समजुतीचा पूल न राहता अहंकाराचा संघर्ष बनतो. डिजिटल माध्यमांनी या समस्येला अधिक गती दिली आहे. आजची पिढी रील्स, छोटे व्हीडीओ, झटपट पोस्ट आणि मथळ्यांवर जगू लागली आहे. त्यामुळे दीर्घकाळ लक्ष केंद्रित करून एखादी गोष्ट समजून घेण्याची क्षमता कमी झाली आहे. सखोल विचार, संयम आणि चिंतन यांना वेळ देण्याची मानसिकता उरलेली नाही. परिणामी जटिल विषयांचे सोपे निष्कर्ष काढले जातात आणि अर्धवट माहितीच्या आधारावर ठाम मते तयार होतात. याचबरोबर माहितीच्या सहज उपलब्धतेमुळे माहितीचा अहंकार निर्माण झाला आहे. इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर काही सेकंदांत मिळते. हे निश्चितच प्रगतीचे लक्षण आहे; पण माहिती म्हणजे ज्ञान आणि ज्ञान म्हणजे शहाणपण, असा गैरसमज वाढत आहे. गुगलवर शोधून मिळालेली माहिती अनुभवाची जागा घेऊ शकत नाही. अनुभव माणसाला परिस्थितीचे वास्तव शिकवतो, निर्णयक्षमता विकसित करतो आणि योग्य-अयोग्याचा विवेक देतो. मात्र आज अनेक तरुणांना वाटते की इंटरनेटवर सर्व काही उपलब्ध असल्याने मोठ्यांकडून शिकण्याची गरज उरलेली नाही. त्यामुळे पिढ्यांमधील संवाद कमी होत असून परस्पर आदरही कमी होत चालला आहे. यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये प्रेम व आदराचं नातं राहिलं नाही. या गैरसमजांच्या युगाचा सर्वाधिक परिणाम कुटुंब व्यवस्थेवर दिसून येतो. नवरा-बायको, पालक-मुलं किंवा नातेसंबंधांमध्ये संवादाचा अभाव गंभीर तणाव निर्माण करतो. छोट्या मतभेदांचे मोठ्या संघर्षात रूपांतर होते. संवाद समस्या सोडवण्यासाठी न होता कोण बरोबर आणि कोण चूक, हे सिद्ध करण्याचे साधन बनतो. राग, संशय, अहंकार आणि असुरक्षितता यामुळे संवाद अधिक विषारी बनतो. परिणामी अनेक कुटुंबांत भावनिक दुरावा, ताणतणाव, घटस्फोट आणि हिंसाचाराच्या घटनाही वाढताना दिसतात. विशेषतः आर्थिक स्वातंत्र्य आणि व्यावसायिक यश यांचा गैरअर्थ काढला जात आहे. आर्थिक स्वावलंबन हे सकारात्मक परिवर्तन असले तरी त्याचा वापर नातेसंबंधांमध्ये वर्चस्व गाजवण्यासाठी होऊ लागला, तर कुटुंब व्यवस्थेचे संतुलन ढासळते. परस्पर आदर, कृतज्ञता आणि जबाबदारी या मूल्यांची जागा स्पर्धा आणि अहंकार घेत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. कामाच्या ठिकाणीही गैरसमजांची किंमत मोठी ठरत आहे. अनेक संस्था तंत्रज्ञान, धोरणे आणि व्यवस्थापनावर कोट्यवधी रुपये खर्च करतात; पण संवादकौशल्याकडे दुर्लक्ष करतात. कर्मचारी स्पष्टता न घेता गृहीत धरतात, वरिष्ठ सूचना देतात पण उद्देश समजावून सांगत नाहीत आणि टीका म्हणजे वैयक्तिक अपमान असा समज केला जातो. परिणामी कार्यक्षमता घटते, तणाव वाढतो आणि संस्थात्मक वातावरण बिघडते. आजच्या काळातील आणखी एक मोठी समस्या म्हणजे नाजूक अहंकार. अनेकांना स्वतःबद्दल प्रचंड आत्मविश्वास असतो; पण टीका स्वीकारण्याची क्षमता नसते. शिकण्याची वृत्ती कमी होत चालली आहे. प्रत्यक्षात यशस्वी व्यक्तींचे वैशिष्ट्य त्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्यांच्या संवादकौशल्यात आणि शिकण्याच्या तयारीत असते. ते प्रश्न विचारतात, अभिप्राय स्वीकारतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते मनापासून ऐकतात. विडंबना अशी की मानव आता यंत्रांना संवाद साधायला शिकवत आहे; पण स्वतःच एकमेकांशी नीट संवाद साधण्याची कला विसरत चालला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता भाषा समजून घेण्यात प्रगत होत असताना माणूस मात्र दृष्टिकोन समजून घेण्यात अपयशी ठरत आहे. ही परिस्थिती अशीच राहिली, तर समाजातील विश्वास, कुटुंबांची एकता आणि संस्थांची कार्यक्षमता यांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. या समस्येचे समाधान मात्र अवघड नाही. त्यासाठी पुन्हा काही मूलभूत मूल्यांकडे वळावे लागेल की प्रतिक्रिया देण्यापूर्वी ऐकणे, निर्णय घेण्यापूर्वी समजून घेणे, गृहीत धरण्यापूर्वी स्पष्टता मिळवणे आणि उपदेश करण्यापूर्वी शिकण्याची तयारी ठेवणे. संवाद म्हणजे केवळ माहितीची देवाणघेवाण नसून समज निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. समाजाची गुणवत्ता त्याच्या संवादाच्या गुणवत्तेवर ठरते. दुर्दैवाने आज आपल्या संवादात संयम, आदर आणि संवेदनशीलता कमी होत आहे. गैरसमज हा आता छोटा सामाजिक दोष राहिलेला नाही; तो एक गंभीर सामाजिक आजार बनत चालला आहे. त्यावर वेळीच उपाय केले नाहीत, तर डिजिटल युगातील ही प्रगती मानवी नातेसंबंधांच्या विनाशाचे कारण ठरू शकते.

# अन्नातील भेसळ की संथ विषप्रयोग?



सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण जे काही खातो-पितो, ते आपल्या शरीराला ऊर्जा देण्यासाठी की शरीरात हळूहळू विष भिनवण्यासाठी? हा प्रश्न आज प्रत्येक भारतीय नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. नुकतीच अन्न व औषध प्रशासनात (FD) एका कर्तव्यदक्ष आणि धडक कारवाईसाठी प्रसिद्ध असलेल्या आयएएस अधिकाऱ्याची बदली झाली आणि अवघ्या महिनाभरात महाराष्ट्रभर कोट्यवधी रुपयांचा भेसळयुक्त साठा जप्त करण्यात आला, हजारो दुकाने सील झाली.

या एकाच कारवाईने हे सिद्ध केले आहे की, आपण ज्याला अन्न समजून खात आहोत, त्यात सर्रास भेसळ सुरू आहे. पण विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की, जेव्हा एखादा निष्पक्ष अधिकारी येतो तेव्हाच ही साखळी का समोर येते? एरवी हे सगळं कोणाच्या आशीर्वादाने सुरू असतं? खरे चोर कोण: भेसळ करणारे की त्यांना पाठीशी घालणारे?

आज बाजारात कॉस्ट कटिंग (उत्पादन खर्च कमी करणे) आणि जास्तीत जास्त नफा कमवण्याच्या हव्यासापोटी निष्पाप नागरिकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे. निष्पाप लहान मुले, तरुण आणि वृद्ध यांच्या ताटात थेट विष वाढले जात आहे. या संपूर्ण साखळीत सर्वात मोठा प्रश्न हा पडतो की, मुख्य गुन्हेगार कोण? तो व्यापारी जो पैशाच्या हव्यासापोटी अन्नात रासायनिक भेसळ करतो, की तो भ्रष्ट शासकीय अधिकारी जो महिन्याचा हप्ता घेऊन या मृत्यूच्या व्यापाराकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करतो?

शासकीय नोकरी आणि पगार असूनही जे अधिकारी आपले कर्तव्य चोख बजावत नाहीत, उलट भ्रष्टाचाराचे खतपाणी घालून या गोरखधंद्याला पाठिंबा देतात, ते या देशाचे सर्वात मोठे शत्रू आहेत. आज भारतात कॅन्सर, किडनी निकामी होणे आणि हृदयविकाराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अनेक निष्पाप नागरिकांना हे माहीत ही नसते की ज्या आजारामुळे त्यांचा मृत्यू होत आहे, त्याचे मुख्य कारण त्यांनी रोज खाल्लेले भेसळयुक्त अन्न हेच होते. या अशा नफेखोर व्यापाऱ्यांवर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवरसदोष मनुष्यवधाचा (Culpable Homicide) गुन्हा का दाखल होऊ नये?

**कृषीप्रधान देशाची शोकांतिका**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. अहोरात्र कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याच्या मालाला मातीमोल भाव मिळतो. दुसरीकडे, मधले मोठे व्यापारी आणि काही बड्या कंपन्या तोच माल शेतकऱ्याकडून कवडीमोल भावाने खरेदी करतात आणि त्यात रासायनिक भेसळ करून तोच माल बाजारात दुप्पट-तिप्पट भावाने विकून गडगंज संपत्ती कमवतात. हा थेट देशाच्या पाठीच्या कण्यावर आणि सामान्य ग्राहकांच्या खिशावर व आरोग्यावर दरोडा आहे.

अन्न पदार्थांमधील धोकादायक भेसळ आणि त्याचे शरीरावरील परिणाम आपण बाजारातून आणत असलेल्या विविध अन्नपदार्थांमध्ये नफेखोरीसाठी अत्यंत घातक रसायने आणि पदार्थांची भेसळ केली जाते. त्याची काही प्रमुख उदाहरणे आणि शरीरावर होणारे परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

दूध आणि दुग्धजन्य पदार्थ (खवा, पनीर, तूप): युरिया, डिटर्जंट पावडर, स्टार्च, कास्टिक सोडा, आणि पाम ऑईल. लिव्हर आणि किडनी खराब होणे, पोटात गंभीर विकार, लहान मुलांच्या विकासात अडथळा.

**हळद आणि मसाल्यांचे पदार्थ:** लेड क्रोमेट (ङशरव उहीरींश), मेटॅनिलयलो (Metanil Yellow) हा प्रतिबंधित रंग, विटांची भुकटी, लाकडाचा भुसा. कॅन्सर (कर्करोग), मेंदूचे विकार, अशक्तपणा (Anemia), आणि गर्भावस्थेत बाळाला धोका.

**मिरची पावडर:** सुदान रेड रंग (Sudan Red Dye), विटांची भुकटी.पोटाचा कॅन्सर, आतड्यांना सूज येणे आणि तीव्र जळजळ.

**खाद्यतेल:** अर्जेमोन तेल (rgemone Oil), स्वस्त मिनरल ऑईल, पाम ऑईल.३९;ड्रॉप्सी३९; (Dropsey) नावाचा आजार, अंधत्व, हृदयविकार आणि यकृताचे आजार.

**चहापत्ती:** वापरलेली आणि वाळवलेली चहापत्ती, त्यावर मारलेले कृत्रिम रंग आणि लोहकण (Iron Filings).पचनसंस्थेचे गंभीर आजार आणि अल्सर.

**फळे आणि भाज्या:** कॅल्शियम कार्बाइड (फळे पिकवण्यासाठी), कॉपर सल्फेट आणि मॅलाचाईट ग्रीन (भाज्या हिरव्यागार दिसण्यासाठी). मज्जासंस्थेचे आजार, चक्कर येणे, त्वचेचे आजार आणि कॅन्सरचा धोका.

**आता जागृत होण्याची वेळ:** आपण काय करू शकतो? व्यवस्था पूर्णपणे सडली आहे म्हणून हात जोडून बसण्यात अर्थ नाही. आपली लढाई आपल्यालाच लढावी लागेल, कारण आपल्या आरोग्यासाठी दुसरा कोणीही पुढे येणार नाही. जर आपण स्वतः बदललो, तर बाजारपेठेला बदलावेच लागेल. यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे:

१. शेतकऱ्यांकडून थेट खरेदी करा (पहिले पाऊल) शक्यतो बाजारातील चकचकीत पॅकेटबंद आणि ब्रँडेड वस्तू घेण्याऐवजी थेट स्थानिक शेतकऱ्यांकडून धान्य, डाळी आणि मसाले खरेदी करा. यामुळे शेतकऱ्याला चांगला भाव मिळेल आणि आपल्याला शुद्ध माल मिळेल.

२. घरीच अन्नपदार्थ तयार करण्यावर भर द्या (प्रक्रिया टाळा) बाजारातील इन्स्टंट किंवा रेडी-टू-ईट पॅकेटबंद मसाल्यांवर अवलंबून राहण्यापेक्षा उन्हाळ्यात वर्षभराचे मसाले (जसे की शुद्ध हळद, तिखट) स्वतः डोळ्यासमोर दळून आणून घरी तयार करा.

३. तक्रार करण्याची सवय लावा (प्रशासनाला जागे करा) जर तुम्हाला एखाद्या अन्नपदार्थाच्या गुणवत्तेवर शंका आली, तर अन्न व औषध प्रशासनाच्या (FD) पोर्टलवर किंवा टोल-फ्री क्रमांकावर तात्काळ तक्रार नोंदवा. तक्रार करून गप्प न बसता त्याचा पाठपुरावा (Follow-up) करा.

**४. ग्राहक म्हणून जागरूक व्हा!** (अधिकार वापरा) फक्त ब्रँडचे नाव किंवा आकर्षक पॅकिंग पाहून वस्तू खरेदी करू नका. पदार्थाची एक्सपायरी डेट, त्यातील घटक (Ingredients) आणि FSSI चा लोगो आवर्जून तपासा.

**अंतिम विचार**-भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत हे खरे आहे, पण ग्राहक म्हणून आपली उदासीनता या भ्रष्टाचाराला अधिक बळ देते. जर प्रत्येक नागरिकाने योग्य पद्धतीने काम केले, भ्रष्टाचाराला खतपाणी घालणे बंद केले आणि स्वतःच्या आरोग्याविषयी जागरूक राहून भेसळखोरांना जाब विचारला, तर भारताची अर्थव्यवस्था केवळ मोठीच होणार नाही, तर हा देश सशक्त आणि निरोगी होईल.

लक्षात ठेवा, निरोगी शरीर हीच खरी संपत्ती आहे. पैशाच्या मागे लागलेल्या व्यापाऱ्यांना आणि हप्ता खाणाऱ्या अधिकाऱ्यांना आपल्या जीवाशी खेळण्याचा कोणताही अधिकार नाही. आजच जागे व्हा, शुद्ध अन्न निवडा आणि आरोग्याचा अधिकार हक्काने मागून घ्या!

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक
भोसीकर फुड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

# ...तर देश सुजलाम् सुफलाम् होईल!

शेती...शेतीचे प्रश्न अलिकडील काळात निर्माण होत आहेत. शेती पीकत नाही. म्हणूनच लोकं आत्महत्या करीत आहेत.

कारण सतत कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ शेतीच्या पिकण्यावर बंधन आणतं. त्यामुळंच शेती करायला परवडत नाही व त्यातूनच आत्महत्या. मग शेतीच परवडत नाही, शेती करण्यातून प्रश्नचिन्हं निर्माण होतात. त्यातूनच पुढे आत्महत्या. मग शेती कोण करणार? हाही एक प्रश्नच निर्माण झाला व लोकांनी शेत्या विकायला सुरुवात केली.

शेतकरी, जे गरीब होते ज्यांना शेती परवडत नव्हती. त्यांनी आपल्या आपल्या शेत्या विकायला सुरुवात केली व शेत्या विकल्या. त्या शेत्या त्यांनी थेट विकल्या नाहीत तर त्या शेत्या दलालांमार्फत विकल्या आणि त्याही उद्योगपतींना आणि शेतीवर फ्लॅट वा प्लॉट टाकणाऱ्या भूमाफियांना. ज्यांना शेत्या करण्याची गरज नव्हती. उलट असे करण्यातून कितीतरी हेक्टर जागा ही आपोआपच पडीक झाली. जी वाहात होती. शिवाय जे उद्योगपतींनी या भूमीत कारखाने उभे केले, त्या कारखान्यातून निघणाऱ्या धुराने व सांडपाण्याने कितीतरी हेक्टर शेतीचे वाहीत पट्टे पीक न पीकत असल्याने बंदर ठरले. शिवाय यातून तापमान वाढले व जनतेच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. तेच भूमाफियांनीही केले.

भूमाफियांनीही पैशाच्या भरवशावर ज्या शेत्या घेतल्या त्यात त्या भूमाफियांनी त्या आपल्या शेतीतून बाजूच्या शेतीत जाणारे व वर्षानुवर्ष वाहतुकीसाठी असणारे रस्ते बंद केले. याचं कारण होतं की बाजूच्या शेतीत जाणारे पांदण रस्ते जर बंद केले तर आपल्याला पांदण रस्ते बंद केल्यानं व वाहतुकीची कोंडी झाली असल्यानं बाजूचा शेतकरी आपल्याला आपली शेती अगदी पडीक दामात विकेलच.

महत्वपूर्ण बाब ही की ते उद्योगपती. त्यांनी शेत्या घेतल्या आणि त्या शेत्या तशाच काही वर्ष पडीक ठेवून त्या शेतीवर पुढील काळात कारखाने उभे राहिले. शिवाय त्या वाहीत शेत्यांना पडीक केलं. तिथं कारखाने उभे केले ते न करता किंवा त्या शेत्या कारखान्यासाठी घेणाऱ्यांना न वापरू देता जर ते कारखाने डोंगराळ भागात जिथं शेत्याच करता, येत नाही, त्या भागात उभारले गेले असते तर शेतीची होणारी ही कितीतरी हेक्टर जमीन बंजर झाली नसती. तसेच भूमाफियांना जर ती वाहती जमीन विकली गेली नसती तर जाणीवपूर्वक त्या जमिनी ओसाड झाल्या नसत्या आणि ते जर घडले नसते तर आज कितीतरी हेक्टर क्षेत्र हे वाहीजुपीत राहिले असते.



आजही काही वाचलेल्या जमिनी आहेत. परंतु त्या जमिनीच्या हस्तांतरणाचा हिशोब जर काढला तर कितीतरी जमिनी ह्या भूमाफियांच्याच ताब्यात आहेत. काही ठिकाणी प्लॉट पडलेले आहेत तर काही ठिकाणी प्लॉटं नाहीत. मात्र तारेची कुंपनं केलेली आहेत. काही जमिनी या कारखानदार मालकशाहीच्या ताब्यात आहेत. त्यावरही शेती होत नसून त्यावरही तारेची कुंपनं आहेत. जेणेकरुन त्या वाहीत जमिनी बंजर आहेत आणि अशाच स्वरुपाच्या कितीतरी हेक्टर जमिनी ह्या बंजर असल्यानं लागवडीचे क्षेत्र अलीकडील काळात कमी झालेले आहेत. काही लोकांना आजही शेती कराविशी वाटते. परंतु त्यांना शेती करता येत नाही, कारण त्यांच्याजवळ शेती नाही आणि शेतीच्या किंमती बऱ्याच वाढलेल्या आहेत. त्यामुळंच ते विकतही घेवू शकत नाहीत आणि शेती जे करीत नाहीत. अशांच्या ताब्यात आज शेत्या आहेत की, ज्या शेतीवर पीकच पिकवलं जात नाही. याचा दुष्परिणाम हा होत आहे की अशा कितीतरी हेक्टर शेत्या की ज्या शेत्या बंजर असल्यानं व त्या भूमाफिये व कारखानदार मालक यांच्या ताब्यात असल्यानं व शेत्या पिकवल्या जात नसल्यानं अलीकडील काळात शेतीतून मुबलक प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध होत नाही व अन्नधान्यच जिथं उपलब्ध होत नाही. तिथं अन्नधान्याचा पुरवठा देखील कसा होवू शकेल? त्यामुळंच अन्नधान्याचक गरज पूर्ण होत नसल्यानं अन्नधान्य बाहेर देशातून आयात करावं लागतं.

विशेष बाब ही की, ज्या देशात आपण राहतो, त्याच देशात अन्नधान्य पिकविण्यासाठी सोयी उपलब्ध असताना त्या सोयींचा योग्य वापर केल्या जात नाही. येथेच कितीतरी हेक्टर जमिनी आहेत की ज्या जमिनीचा योग्य उपयोग केल्या जात नाही. तसाच योग्यरीतीने उपभोग घेतल्या जात नाही. ही शोकांतिकाच आहे. यावर उपाय एकच. तो म्हणजे अशा जमिनी शोधणे. ज्या भूमाफिये व कारखानदारांच्या ताब्यात आहेत. त्या सरकारनं आपल्या ताब्यात घेणे व त्याच जमिनी शेती करण्यास इच्छुक असणाऱ्या गोरगरिबांना प्रदान करणे. ज्यांच्याकडे जमिनी नाहीत, जेणेकरून ती शेती करुन कितीतरी लोकं पोट भरु शकतील. त्यांना रोजगार मिळेल. असे जर झाले तर देशातील अन्नधान्याचा भासणारा तुटवडा समाप्त करता येईल. पीक आपल्याच देशात पीकवता येत असल्यानं आयात होणारा माल कमी करता येईल. आयातीवर लागणारे मूल्यही कमी होईल. एकंदरीत सांगायचं झाल्यास असं केल्यानं कितीतरी हेक्टर क्षेत्र हे लागवडीखाली येईल. तसेच कितीतरी लोकं शेती करू लागतील. कितीतरी प्रमाणात अन्नधान्याची निर्मिती होईल. तसंच शेतीतून विपुल प्रमाणात अन्नधान्य पीकत असल्यानं देशातील अन्नधान्यात वाढलेली महागाई कमी करता येईल. आयातीवर खर्च होणारे मूल्य वाचल्यानंतर वाचलेल्या पैशातून देशाचा विकास करता येईल. महत्वाचं सांगायचं झाल्यास देश सुजलाम सुजलाम होईल यात शंका नाही.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# अन्नाच्या घासात दडलेला मृत्यूचा सापळा

मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्नाला सर्वोच्च स्थान आहे. अन्न हे आरोग्य, ऊर्जा आणि जीवनाचे आधारस्तंभ मानले जाते. परंतु जगभरातील लाखो लोकांसाठी हेच अन्न आज आजारपण, अपंगत्व आणि मृत्यूचे कारण ठरत आहे, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. जागतिक आरोग्य संघटनेने (World Health Organization) प्रसिद्ध केलेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ फुडबॉर्न डिजीजेस २०००-२०२१' या अहवालाने जगाला गंभीर इशारा दिला आहे.



दररोज ४२ लाखांहून अधिक लोक दूषित अन्नामुळे आजारी पडतात आणि तब्बल ४,१०० लोक मृत्युमुखी पडतात. ही आकडेवारी केवळ आरोग्य क्षेत्रासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी चिंतेची घंटा आहे. अन्नजन्य आजारांविषयी समाजात एक सर्वसाधारण समज आहे की उघड्यावर विकले जाणारे पदार्थ, अस्वच्छ हॉटेल्स किंवा फास्ट फुड हेच त्यांचे प्रमुख कारण असते. मात्र डब्ल्यूएचओच्या अहवालाने हा गैरसमज दूर केला आहे. शेतातील उत्पादनापासून ते ग्राहकाच्या ताटापर्यंतच्या संपूर्ण अन्नसाखळीत प्रदूषणाची शक्यता निर्माण झाली आहे. शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक खते, कीटकनाशके, पाण्याचे प्रदूषण, अन्न साठवणुकीतील त्रुटी, वाहतूक व्यवस्था आणि घरातील स्वयंपाकघरातील अस्वच्छता यांसारखे अनेक घटक अन्न दूषित होण्यास कारणीभूत ठरत आहेत.

या अहवालातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे दूषित अन्नामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी तब्बल ७३ टक्के मृत्यू रासायनिक प्रदूषणामुळे होत आहेत. फुड पॉइझनिंग म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर बॅक्टेरिया, विषाणू किंवा जंतुसंसर्ग येतो. परंतु आर्सेनिक, शिसे, पारा, कीटकनाशकांचे अवशेष आणि इतर घातक रसायने मानवी शरीरात हळूहळू विष पसरवत आहेत. यामुळे कर्करोग, किडनी विकार, यकृताचे आजार, मेंदूवरील परिणाम आणि मुलांच्या शारीरिक-मानसिक विकासावर गंभीर दुष्परिणाम होत आहेत. विशेष म्हणजे भारत आणि चीन यांसारख्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या देशांना या संकटाचा सर्वाधिक फटका बसत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अन्नसुरक्षेच्या या संकटामागे हवामान बदल हा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, पूर आणि उष्णतेच्या लाटा यांमुळे अन्नातील जिवाणू आणि विषाणूंची वाढ अधिक वेगाने होत आहे. परिणामी अन्नजन्य रोगांचे प्रमाण वाढत आहे. दुसरीकडे पशुपालन आणि शेती क्षेत्रात अँटिबायोटिक औषधांचा वाढता वापर अनेक जिवाणूंना औषधप्रतिरोधक बनवत आहे. यामुळे संसर्ग झाल्यास उपचार अधिक कठीण आणि खर्चिक होत आहेत. हे संकट भविष्यात आणखी गंभीर स्वरूप धारण करू शकते. सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे लहान मुले या संकटाची सर्वात मोठी बळी ठरत आहेत. पाच वर्षांखालील मुलांमध्ये दूषित अन्नामुळे आजारी पडण्याचा आणि मृत्यू होण्याचा धोका प्रौढांच्या तुलनेत २.७ पट अधिक आहे. कुपोषण, कमी रोगप्रतिकारशक्ती आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे मुलांचे आरोग्य अधिक धोक्यात येते. बालमृत्यू रोखण्यासाठी अन्नसुरक्षा ही आता आरोग्य धोरणाचा केंद्रबिंदू बनविण्याची गरज आहे.

दूषित अन्नामुळे होणारे आर्थिक नुकसानही तितकेच भयावह आहे. दरवर्षी सुमारे ५४ लाख कोटी रुपयांचे नुकसान जगाला सहन करावे लागत आहे. उपचारांचा खर्च, कामाचे गमावलेले दिवस, उत्पादनक्षमतेत घट आणि आरोग्य व्यवस्थेवरील वाढता ताण यामुळे अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होतो. त्यामुळे अन्नसुरक्षा हा केवळ आरोग्याचा नव्हे तर आर्थिक विकासाचाही प्रश्न आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात या अहवालाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या तपासण्या अधिक काटेकोर करणे, कीटकनाशकांच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, शेतकऱ्यांना सुरक्षित शेती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, अन्न प्रक्रिया उद्योगांवर कठोर देखरेख ठेवणे आणि ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. घरगुती पातळीवरही स्वच्छ पाणी वापरणे, अन्न योग्य तापमानात साठवणे, भाज्या-फळे नीट धुणे आणि कालबाह्य अन्नपदार्थ टाळणे यासारख्या साध्या सवयी महत्त्वाच्या ठरतात.

आज जग एचआयव्ही, क्षयरोग आणि मलेरियासारख्या मोठ्या आरोग्य आव्हानांशी लढत आहे. परंतु दूषित अन्नामुळे होणारे आजार आता त्याच पातळीचे जागतिक संकट बनले आहेत. प्रत्येक नागरिकाच्या ताटात सुरक्षित आणि पोषक अन्न पोहोचविणे ही केवळ सरकारची नव्हे तर शेतकरी, उद्योग, व्यापारी आणि ग्राहक अशा संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अन्न हे जीवनाचे प्रतीक आहे; ते मृत्यूचे कारण ठरू नये. डब्ल्यूएचओच्या अहवालाने दिलेला हा इशारा केवळ आकडेवारी म्हणून न पाहता, अन्नसुरक्षेच्या दिशेने तातडीने आणि ठोस पावले उचलण्याची संधी म्हणून स्वीकारली पाहिजे. अन्यथा उद्याचा प्रत्येक घास आरोग्याऐवजी संकट घेऊन येऊ शकतो.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत जि. सांगली

# राज्यात मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला प्रारंभ

## लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी पशुसंवर्धन विभागाचे काटेकोर नियोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प व फऱ्या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. डॉ. किरण पाटील यांनी सांगितले की, लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

यावेळच्या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे पारदर्शक डिजिटल ट्रॅकिंग होय. आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सर्व पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कडक सूचना दिल्या आहेत की, प्रत्येक पशुधनाला लस टोचल्यानंतर त्याची नोंद 'भारत पशुधन प्रणाली' या केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर रिअल-टाइम (तात्काळ) करणे आवश्यक आहे. पशुधनाचे टॅगिंग (१२ अंकी बिल्ला) करूनच ही नोंदणी केली जावी, जेणेकरून मोहिमेच्या प्रगतीवर थेट देखरेख ठेवता येईल व बोगस नोंदींना आळा बसेल, असेही त्यांनी म्हटले आहे.

## ग्रामपंचायत भायेगाव : तीन वार्डातील सात जागेसाठी आरक्षण सोडत जाहीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील भायेगाव ग्रामपंचायत आरक्षण सोडत नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडळ अधिकारी संतोष अंकुसकर यांच्या उपस्थितीत ११ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे काढण्यात आली. या सोडतीत तीन वार्डातील सात जागेसाठी आरक्षण सोडण्यात आले. सात जागेपैकी चार जागा महिलांसाठी आरक्षित झाल्या. सरपंच पद सर्वसाधारण पुरुषासाठी आरक्षित झाले आहे.

जनगणना २०११ नुसार आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी संतोष असकुलकर, तलाठी योगीता अन्नमवार, ग्रामसेवक एस. एस. वाकोरे यांच्या उपस्थितीत तीन वार्डातील सात जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली.

यावेळी सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर, उपसरपंच बालाजी कोल्हे, पोलीस पाटील शिवानंद खोसडे, ग्रामपंचायत सदस्य गौतम भालेराव, देवराव कोल्हे, गंगाधर कोल्हे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी वार्ड क्र. १ एसी पुरुष, सर्वसाधारण पुरुष, वार्ड क्रं. २ सर्वसाधारण पुरुष, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण महिला, वार्ड क्रं. ३ सर्वसाधारण महिला, ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाले आहे.

## शेतीसाठी विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची नांदेड जिल्हा दक्षिण युवक काँग्रेसची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी) –**शेतीसाठी होणारा विद्युत पुरवठा सुरळीत ठेवावा व वीज कपातीचा निर्णय तत्काळ स्थगित करावा, या मागणीचे निवेदन नांदेड जिल्हा दक्षिण युवक काँग्रेसच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना देण्यात आले.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या जिल्ह्यातील फळबागा तसेच मसाला पिकांना पाण्याची नितांत आवश्यकता आहे. विशेषतः हळद लागवडीचे मोठे नुकसान होत असून, अनेक ठिकाणी पिके कोमेजण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत महावितरणने शेतीसाठी होणाऱ्या वीज पुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

यावेळी राज्याचे ऊर्जामंत्री यांनी वीज कपातीचा निर्णय स्थगित करून शेतीसाठी नियमित व अखंडित वीज पुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी निवेदन देताना नांदेड जिल्हा दक्षिण युवक काँग्रेसचे अध्यक्ष अतुल पेदेवाड, काँग्रेसचे कार्यालयीन सचिव प्रकाश दीपके, युवक काँग्रेसचे महासचिव शिवम पाटील, सचिव सचिन गुद्दे, देगलूर-बिलोली विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष उत्कर्ष सोंडारे, एनएसयूआय प्रदेश महासचिव किरण पडलवार, नांदेड शहर जिल्हाध्यक्ष (सोशल मीडिया) गंगाधर आडेराव, प्रथमेश गिरी, दक्षिण महासचिव लक्ष्मण राऊत आदी उपस्थित होते.

## प्रधानमंत्री मातृ सुरक्षा दिवसानिमित्त गरोदर माता तपासणी शिबिराला उत्तम प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी) –**प्रधानमंत्री मातृसुरक्षा दिवसाचे औचित्य साधून प्रा. आ. केंद्र बारुळ येथे विशेष तपासणी शिबिराचे आयोजन डॉ. एच. के. साखरे यांच्या नियोजनात करण्यात आले. या शिबिराला महिलांनी उत्तम प्रतिसाद दिला.

प्रत्येक गरोदर मातांची योग्य काळजी, सुखरूप बाळंतपण व बाळाची काळजी घेण्याच्या प्रमुख उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सर्व उपकेंद्राच्या १०२ गरोदर मातांची विशेष तपासणी करण्यात आली. यात उपकेंद्रनिहाय बारुळ १८, बाचोटी २०, चिखली २१, हळदा १०, काटकळंबा १३, कौठा १५, राऊतखेडा ६ गरोदर मातांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शिबीर यशस्वीतेसाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच. के. साखरे यांच्या मार्गदर्शनात आरोग्य सहायक बाबाराव येलुरे, एल. एच. व्ही. छाया तेलंगे, हरिवंदना घडे, एल. एस. ओ. अप्पाराव पोले सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, जी. एन. एम. आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्ती यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ग्रामपंचायत काकांडी चार वार्डातील आकरा जागेसाठी आरक्षण सोडत; महिलांसाठी सहा तर पुरूषांसाठी पाच जागा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील काकांडी ग्रामपंचायत आरक्षण सोडत नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी विठ्ठल कांबळे, तलाठी गौतम पांढरे यांच्या उपस्थितीत ११ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे काढण्यात आली.

चार वार्डातील आकरा जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. आकरा जागेपैकी सहा जागा महिलांसाठी आरक्षित झाल्या आहेत. सरपंच पद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित झाले आहे. जनगणना २०११ नुसार एकूण लोकसंख्या ३८०० असून, आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी विठ्ठल कांबळे, तलाठी गौतम पांढरे, ग्रामसेवक तुकाराम शिंदे यांच्या उपस्थितीत चार वार्डातील आकरा जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी सरपंच शरद भवर, माजी सरपंच सुदिन बागल, यज्ञकांत कानोले, रावण वर्तळे, रावसाहेब बंडे, बाळू मंदवाड, मोतीराम कोणके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी वार्ड क्रमांक १- एसी पुरूष, ओबीसी महिला, सर्वसाधारण महिला, वार्ड क्र. २ -एसी महिला, सर्व साधारण महिला, सर्वसाधारण पुरूष, वार्ड क्रमांक ३ ओबीसी पुरुष, सर्वसाधारण पुरूष सर्वसाधारण महिला, वार्ड क्रमांक ४ सर्वसाधारण पुरूष व सर्वसाधारण महिला अशा चार वार्डातील आकरा जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली.

## ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफने प्रवाशांचा २२.६० लाख किमतीचा हरवलेला माल केला परत



**नांदेड (प्रतिनिधी) –**रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभागाने 'ऑपरेशन अमानत' अंतर्गत हरवलेल्या व बेवारस अवस्थेत आढळलेल्या प्रवाशांच्या मालमत्तेचा शोध घेऊन ती त्यांच्या मूळ मालकांना परत करण्याची आपली प्रवासी सेवा व सुरक्षेबाबतची बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

सन २०२६ मध्ये मे महिन्यापर्यंत नांदेड विभागातील आरपीएफने एकूण ६७ प्रकरणांमध्ये हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती संबंधित प्रवाशांना परत केली. परत करण्यात आलेल्या मालमत्तेची एकूण किंमत २२ लाख ६० हजार २८६ रुपये इतकी आहे.

या मालमत्तेमध्ये मोबाईल फोन, लॅपटॉप, दागिने, रोख रक्कम, हँडबॅग, प्रवासी सामान, महत्त्वाची कागदपत्रे तसेच इतर मौल्यवान वैयक्तिक वस्तूंचा समावेश होता. रेल्वे प्रवासादरम्यान या वस्तू हरवणे, विसरणे किंवा चुकून मागे राहणे अशा विविध कारणांमुळे त्या प्रवाशांपासून दूर झाल्या होत्या. आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या तत्पर कार्यवाही, सखोल पडताळणी आणि समर्पित प्रयत्नांमुळे या सर्व वस्तू सुरक्षितपणे त्यांच्या वास्तविक मालकांपर्यंत पोहोचविण्यात आल्या.

'ऑपरेशन अमानत' ही रेल्वे सुरक्षा बलाची एक महत्त्वपूर्ण प्रवासी-केंद्रित योजना असून, रेल्वे प्रवासादरम्यान हरवलेल्या वस्तूंची पुनर्प्राप्ती करून त्या संबंधित प्रवाशांना त्वरित परत मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. भारतीय रेल्वेच्या विस्तृत जाळ्यावर सुरक्षित, विश्वासार्ह आणि प्रवासी-अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या आरपीएफच्या वचनबद्धतेचे हे प्रतीक आहे.

या उपक्रमांतर्गत मिळालेले सातत्यपूर्ण यश हे आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या सतर्कता, व्यावसायिकता आणि कर्तव्यनिष्ठेचे द्योतक आहे. हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती प्रवाशांना परत देण्यामुळे संबंधित प्रवाशांना मोठा दिलासा मिळतोच, शिवाय रेल्वे सुरक्षा बलाविषयीचा जनतेचा विश्वासही अधिक दृढ होत आहे.

# बिजूर शिवारातील बार फोडण्याचा प्रयत्न

## संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद; सोशल मीडियावर व्हीडीओ व्हायरल



**शंकरनगर (प्रतिनिधी) –**रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिजूर शिवारात असलेल्या कार्तिकी बारमध्ये मध्यरात्री चोरीचा प्रयत्न झाल्याची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. कॅमेरात कैद झालेल्या चोरट्यांचा व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला आहे. या घटनेमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. हा प्रकार केवळ दारू चोरी करण्यासाठी करण्यात आला होता की, रामतीर्थ पोलिसांना खुले आव्हान देण्याचा प्रयत्न होता, असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

नांदेड - देगलूर राज्य महामार्गालगत असलेल्या बिजूर येथील कार्तिकी बारवर मध्यरात्री चार अज्ञात व्यक्तींनी बार फोडण्याचा प्रयत्न केल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे. संबंधित व्यक्ती बारचे दरवाजे लाथांनी तोडण्याचा प्रयत्न करत असल्याचे तसेच खिडक्यांमधून आत डोकावून पाहत असल्याचे फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे. काहींच्या हातात शस्त्रासारखी वस्तू असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे.

या घटनेमुळे महामार्गालगतच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी पोलीस गस्त अपुरी असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. चोरटे एवढ्या निर्भयपणे बार फोडण्याचा प्रयत्न करत असतील तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचे काय? असा प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे, हा प्रकार रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

**Format C-1**

*(for candidate to publish in Newspapers, TV)*

**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India &Anr.))*

Name and address of candidate : **Krishna Nagesh Patil**
At. Post Ashti, Tal. Hadgaon, Dist. Nanded – 431712

Name of political party : **Independent**

Name of Election : **Nanded Local Authorities Constituency Biennial Election**

*Name of Constituency : **Nanded Local Authorities Constituency**

I, **Krishna Nagesh Patil**, a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Civil Judge Junior Division, Umarkhed | RCC No. 303/25 | Pending before Court | IPC Sections 353, 294, 427, 504, 506 |
| 2. | Hadgaon Civil and Criminal Court | SCC No. 68/2026 | Acquitted on 28/02/2021 | Section 135, Bombay Police Act |
| 3. | NA | NA | NA | NA |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1. | NA | NA | NA |
| 2. | NA | NA | NA |
| 3. | NA | NA | NA |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

**Note:-**

1. The particulars regarding criminal cases pending against the candidate shall be in bold letters.
2. The matter in newspapers shall be published in font size of at least 12.
3. Details should be given separately for each case in separate rows.
4. If a candidate is contesting an election on the ticket of a particular party, he/she is required to inform the party about the criminal cases pending against him/her.
5. The candidate shall report about publishing of declaration regarding criminal cases immediately after such publication to the Returning Officer. In addition, he shall submit a report about publishing of the declaration regarding cases in Format C-4 along with the account of election expenses within 30 days of declaration of result of election. (a) In case of elections to the Lok Sabha and the Legislative Assemblies, this shall be submitted to District Election Officer concerned, (b) In case of elections to the Rajya Sabha and the State Legislative Council, this shall be submitted to the Returning Officer concerned.

# मुदखेड नगरपरिषदेच्यावतीने मान्सूनपूर्व नाले सफाई व गटारी सफाई कामांना वेग



**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड नगर परिषदेच्यावतीने शहरातील मान्सूनपूर्व तयारी अंतर्गत नाले गटारी व पाणी निचरा मार्गाच्या साफसफाईची कामे वेगाने सुरू आहेत.

मुदखेड शहरातील प्रभागांमध्ये गाळ काढणे, कचरा हटवणे व पाणी निचऱ्यातील अडथळे दूर करण्याचे काम नियमितपणे करण्यात येत आहे. नगराध्यक्ष विश्रांती कदम, उपनगराध्यक्ष इमरान शेठ मच्छीवाले, मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्या सूचनेवरून स्वच्छता विभागामार्फत शहरातील प्रमुख नाले व गटारे पावसाळी पाणी निचरा मार्गाची साफसफाई करण्यात येत आहे.

पावसाळ्यात पाणी साचून दुर्गंधी निर्माण होऊ नये तसेच आरोग्यविषयक समस्या उद्भवू नयेत यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. नगर परिषदेच्या वतीने विविध यंत्रणांद्वारे जेसीबी पोकलेन मशीन तसेच मनुष्यबळाच्या सहाय्याने गाळ काढण्याची कामे वेगात सुरू आहेत. शहरातील नागरिकांनी नाल्यामध्ये व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजस्थानी महिला मंडळातर्फे रविवारी मंगल पाठाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने श्री राणी सती दादी माँ मंगल पाठाचे आयोजन रविवार, दि. १४ जून रोजी करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम दुपारी ३.११ वाजता हॉटेल सिटी सिम्फनी, नमस्कार चौक येथे होणार आहे.

या कार्यक्रमात यवतमाळ येथील सुप्रसिद्ध भजन गायक उज्ज्वल खाखोलिया मंगल पाठाचे वाचन तसेच भक्तिमय भजनांची प्रस्तुती करणार आहेत. कार्यक्रमाच्या मुख्य यजमान म्हणून सौ. कलावती ओमप्रकाश काकाणी यांची उपस्थिती लाभणार असून, एका गुप्त दात्याचेही विशेष सहकार्य लाभले आहे. राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. संगीता सोमानी, सचिव सौ. सावित्री बजाज, कोषाध्यक्षा सौ. रीता दायमा, प्रकल्प प्रमुख सौ. ममता व्यास तसेच सौ. चंदा काबरा यांनी सर्व भाविकांना कुटुंबासह उपस्थित राहून मंगल पाठाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# तंत्रमंत्र


विज्ञानयुगातील बितंबातम्या

# बनलेय बॅटरीमुक्त उपकरण! सूर्यप्रकाश खाऊन करेल गॅजेट्स चार्ज... नवीन तंत्रज्ञान समजून घ्या...

**बॅटरी नसलेले उपकरण हा शब्दप्रयोग विचित्र वाटू शकतो. मात्र ओसाका मेट्रोपॉलिटन युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी एक नवीन कृत्रिम प्रकाशसंश्लेषण प्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली बॅटरीशिवाय सूर्यप्रकाशापासून सतत सौर ऊर्जा निर्माण करू शकते. हे शक्य झाले आहे कारण इलेक्ट्रोलायझरमध्ये एक रसायन टाकण्यात आले आहे, जे त्याच्या कार्यावर आपोआप नियंत्रण ठेवते. यामुळे यंत्राची रचना सोपी झाली आहे आणि त्याच्या निर्मितीचा खर्च कमी झाला आहे. भविष्यात या उपकरणाचा उपयोग घरगुती उपकरणे चार्ज करण्यासाठी केला जाऊ शकतो. याचा अर्थ असा की, हे तंत्रज्ञान तुमची उपकरणे वीज किंवा बॅटरीशिवाय सूर्यप्रकाशाचा वापर करून चार्ज करण्याची परवानगी देईल.**

## हे तंत्रज्ञान कसे कार्य करते?

वनस्पतींमधील नैसर्गिक प्रकाशसंश्लेषणाप्रमाणे (स्वतःचे अन्न तयार करण्याची प्रक्रिया), कृत्रिम प्रकाशसंश्लेषण हे एक तंत्रज्ञान आहे जे वनस्पतींप्रमाणे कार्य करते. ते पाणी आणि कार्बन डायऑक्साइड वायूचे स्वच्छ इंधन किंवा ऊर्जेमध्ये रूपांतर करण्यासाठी सूर्यप्रकाशाचा वापर करते. फॉर्मिक ॲसिड हे असेच एक उत्पादन आहे, जे एक रसायन असून त्याचा वापर इंधन आणि ऊर्जा साठवण पद्धत म्हणून केला जाऊ शकतो. या प्रणालींच्या केंद्रस्थानी एक इलेक्ट्रोलायझर असतो, जो सौर सेल्समधून मिळणाऱ्या विजेचे रासायनिक ऊर्जेमध्ये रूपांतर करतो. ती ऊर्जा नंतर फॉर्मिक ॲसिडसारख्या इंधनाच्या स्वरूपात साठवली जाते.



## एमपीपीटीचा वापर

दिवसभर सूर्यप्रकाश स्थिर नसतो. अशा परिस्थितीतही सातत्यपूर्ण कार्यक्षमता टिकवून ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे. यावर उपाय म्हणून अनेक कृत्रिम प्रकाशसंश्लेषण प्रणाली मॅक्सिमम पॉवर पॉइंट ट्रॅकिंग (MPPT) वापरतात. ही एक अशी पद्धत आहे जी सतत व्होल्टेज आणि करंटला ॲडजस्ट करेल, जेणेकरून सोलर सेल्समधून जास्तीत जास्त ऊर्जा मिळत राहील. मात्र पारंपरिक MPPT सेटअप्स सामान्यतः ऊर्जा प्रवाह नियंत्रित करण्यासाठी बॅटरी आणि अतिरिक्त इलेक्ट्रॉनिक घटकांवर अवलंबून असतात. हे प्रभावी असले तरी, ते खर्च आणि प्रणालीची गुंतागुंत दोन्ही वाढवतात. एक स्व-नियमन करणारा इलेक्ट्रोलायझर बॅटरीची गरज दूर करतो.

## यामुळेच बॅटरीची गरज नाही...

असोसिएट प्रोफेसर यासुओ मात्सुबारा आणि प्रोफेसर युताका अमाओ यांच्या टीमने इडा ग्रुप होल्डिंग्ज कंपनी लिमिटेडच्या सहकार्याने आर्टिफिशियल फोटोसिंथेसिसमध्ये इलेक्ट्रोलायझरचीच पुनर्रचना केली. त्यांच्या पद्धतीत एका खास डिझाइन केलेल्या घन इलेक्ट्रोलाइटचा वापर केला जातो. यामुळे इलेक्ट्रोलायझरला MPPT कार्य स्वयंचलितपणे करण्यास अनुमती मिळते, ज्यामुळे बॅटरी-आधारित नियंत्रण प्रणालीची गरज नाहीशी होते. हे लक्षणीयरीत्या फायदेशीर ठरू शकते कारण इलेक्ट्रोलायझर चालवण्यासाठी कोणत्याही बाह्य संगणक, कन्व्हर्टर किंवा बॅटरीवर अवलंबून राहण्याची गरज उरत नाही. त्याऐवजी, ते सूर्यप्रकाशानुसार स्वतःला समायोजित करण्यासाठी स्वतःची उष्णता आणि वीज वाढवण्याची व कमी करण्याची क्षमता वापरते.

## घरातील उपकरणे चार्ज

प्राध्यापक मात्सुबारा यांनी स्पष्ट केले, की पॅव्हेलियनमधील एका लहान मॉडेलला (डायोरामा) ऊर्जा देण्यासाठी पुरेसे फॉर्मिक ॲसिड तयार झाले. यावरून हे सिद्ध होते की ही एक प्रभावी कृत्रिम प्रकाशसंश्लेषण प्रणाली आहे, जिचा उपयोग भविष्यात आपल्या घरातील उपकरणे चार्ज करण्यासाठी केला जाऊ शकतो. याचा अर्थ असा की, भविष्यात फोनसह इलेक्ट्रॉनिक वस्तू विजेविना चार्ज करता येतील.

# धावत्या ट्रेनमध्ये स्वतःच शोधा खाली सीट!

## टीटीईच्या मागे लागण्याची गरज नाही; आयआरसीटीसीचे फिचर समजून घ्या...



**अनेकदा असे दिसून येते की जेव्हा ट्रेनची तिकिटे वेटिंग लिस्टमध्ये राहतात, तेव्हा ते रिकामी जागा शोधण्यासाठी टीटीईच्या मागे लागत राहतात. खरं तर, फार कमी लोकांना हे माहीत आहे की IRCTC वेबसाइटवर एक असे फिचर आहे, ज्यामुळे तुम्ही स्वतः धावत्या ट्रेनमधील रिकाम्या सीट शोधू शकता. यामुळे तुम्हाला TTE च्या मागे लागण्याची गरज नाही. IRCTC च्या या फिचरला 'चार्ट व्हॅकन्सी' (Chart Vacancy) म्हणतात. यामुळे तुम्ही IRCTC वेबसाइटवर रिकाम्या जागा सहजपणे तपासू शकता. तुम्हाला फक्त हे जाणून घ्यायचे आहे की याचा वापर कसा करायचा...**

## चार्ट व्हॅकन्सी फिचर काय आहे?

हे IRCTC द्वारे प्रदान केलेले एक फिचर आहे, जे तुम्हाला धावत्या ट्रेनमधील रिकाम्या जागांबद्दल माहिती मिळवण्यास मदत करते. तांत्रिक भाषेत सांगायचे झाल्यास, हा ट्रेनसाठी एक ऑनलाइन थेट आरक्षण चार्ट आहे, जो अंतिम चार्ट तयार झाल्यानंतर पाहता येतो. यामुळे तुम्हाला ट्रेनच्या कोणत्या डब्यात कोणती बर्थ किंवा सीट रिकामी आहे याची थेट माहिती मिळते. तुम्ही तुमच्या मोबाईलवर रिकामी जागा तपासू शकता आणि थेट टीटीईकडे जाऊन नियमांनुसार ती जागा स्वतःसाठी राखून घेऊ शकता.

## रिकामी जागा कशी शोधावी?

धावत्या ट्रेनमधील रिकाम्या जागांची माहिती मिळवणे खूप सोपे आहे. हे करण्यासाठी सर्वप्रथम, IRCTC च्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या किंवा रेल कनेक्ट ॲप उघडा. होम पेजवरील 'चार्ट्स / व्हॅकन्सी' (Charts / Vacancy) या पर्यायावर क्लिक करा, जे तुम्हाला थेट 'रिझर्व्हेशन चार्ट' (Reservation Chart) पेजवर घेऊन जाईल. तुमचा ट्रेन क्रमांक, प्रवासाची तारीख आणि बोर्डिंग स्टेशन टाका. 'गेट ट्रेन चार्ट' (Get Train Chart) वर क्लिक करा. यामुळे ट्रेनचा वर्गानुसार आराखडा उघडेल. फर्स्ट एसी, सेकंड एसी, थर्ड एसी किंवा स्लीपरमधून तुमच्या कोचचा प्रकार निवडा.




तुम्हाला कोच आणि सीट क्रमांकासह रिकाम्या जागांची संपूर्ण यादी मिळेल.

## जागा आढळल्यास काय करावे?

सर्वप्रथम, रिकाम्या जागेचा क्रमांक आणि कोच क्रमांक लिहून घ्या. विलंब न करता टीटीईला (TTE) शोधा. रिकाम्या जागेबद्दल टीटीईला माहिती द्या. आवश्यक असल्यास, ऑनलाइन चार्ट तपासा. रिकामी जागा तुमच्या नावावर वाटप करण्यास टीटीईला सांगा. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, रेल्वे नियमांनुसार, टीटीईला 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर रिकाम्या जागा वाटप करण्याचा अधिकार आहे. टीटीई तुम्हाला ठरलेल्या नियमांनुसार आणि भाड्याच्या फरकानुसार, प्रतीक्षा यादीतील तिकिटाच्या बदल्यात एक पावती देईल आणि तुम्हाला एक अद्ययावत तिकीट प्रदान करेल. त्यानंतर तुम्ही त्या जागेवर प्रवास करू शकता.

# फोटो शेअर करण्याचे टेंशन संपले!

## ही सेटिंग सोडवेल तुमची समस्या... तुमचे फोटो मित्र अन् आणि कुटुंबीयांना मिळतील आपोआप




**स्मार्टफोनच्या युगात, प्रसंग कोणताही असो, प्रत्येकजण आपल्या स्मार्टफोनवर फोटो काढतो. पण मग सुरू होते सर्वात कंटाळवाणे काम: इतरांसोबत फोटो शेअर करणे. कुटुंबातील कोणी ना कोणी सदस्य तुम्हाला सतत फोटो पाठवायला सांगतो, ज्यामुळे तुमची गॅलरी फक्त एक फॉरवर्डिंग स्टेशन बनते. तोच फोटो वेगवेगळ्या ॲप्सवर वारंवार पाठवल्याने केवळ वेळच वाया जात नाही, तर गोंधळही निर्माण होतो. ही समस्या सोडवण्यासाठी एक स्मार्ट आणि सोपा मार्ग आहे. गुगल फोटोज पार्टनर शेअरिंग फीचर सादर करते. या फीचरचा वापर करून तुम्ही निवडलेले फोटो किंवा तुमचे सर्व फोटो तुमच्या जोडीदारासारख्या किंवा भावंडांसारख्या विश्वासू व्यक्तीसोबत आपोआप शेअर करू शकता. चला, हे फीचर कसे वापरायचे ते शिकूया...**

» पार्टनर शेअरिंग फीचर काय आहे? : गुगल फोटोजमधील हे फीचर तुमच्या पत्नी किंवा बहिणीसारख्या खास व्यक्तीसोबत दररोज प्रत्येक फोटो शेअर करण्याचा त्रास दूर करते. तो रोजचा क्षण असो किंवा एखादा मोठा कार्यक्रम, तुम्हाला फोटो स्वतः निवडून पाठवण्याची गरज भासणार नाही. तुमच्या पार्टनरला नेहमी नवीनतम फोटोंचा आपोआप ॲक्सेस मिळेल. सोप्या भाषेत सांगायचे तर, तुम्ही तुमच्या फोनवर क्लिक केलेले कोणतेही फोटो त्यांना पाहता येतील.

» हे फीचर कसे वापरावे? : हे फीचर वापरणे खूप सोपे आहे. सर्वप्रथम, गुगल फोटोज ॲप उघडा. वर उजवीकडे असलेल्या तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा. नंतर खाली स्क्रोल करा आणि फोटो सेटिंग्जवर क्लिक करा. शेअरिंग पर्यायावर क्लिक करा. अनेक पर्याय दिसतील. पार्टनर शेअरिंगवर क्लिक करा. तुम्हाला हे वैशिष्ट्य ज्या तारखेपासून सुरू करायचे आहे, ती तारीख निवडण्यासाठी सुरुवातीची तारीख (Starting Date) या पर्यायावर क्लिक करा. तुम्हाला शेअर करायच्या फोटोंची संख्या निवडण्यासाठी शेअर करण्यासाठी फोटो निवडा (Choose Photo to Share) वर क्लिक करा. खाली दिलेल्या पार्टनर निवडा (Select Partner) वर क्लिक करा. तुमच्या संपर्क सूचीमधून कोणताही एक नंबर निवडा.

» या गोष्टी लक्षात ठेवा... : गोपनीयता आणि सुरक्षितता जपण्यासाठी तुमच्या शेअरिंग सेटिंग्जचे वेळोवेळी पुनरावलोकन करा. हे लक्षात ठेवा की पार्टनर शेअरिंग तुमच्या फोनमधील अनेक वैयक्तिक फोटो आपोआप शेअर करते, त्यामुळे आमंत्रण पाठवण्यापूर्वी काळजी घ्या. केवळ तुमच्या अत्यंत जवळच्या आणि विश्वासू व्यक्तीलाच पार्टनर म्हणून जोडा आणि वेळोवेळी काय शेअर केले जात आहे हे तपासत रहा.




# कधी रिस्टार्ट करावा वाय-फाय राउटर?

## जास्त इंटरनेट स्पीडसाठी हे नियम लक्षात घ्या...

**तुम्ही तुमचा राउटर किती वेळा रीस्टार्ट करावा? तुमच्या लक्षात आले आहे का की काही उपकरणे, एकदा चालू केल्यावर क्वचितच बंद केली जातात. वाय-फाय राउटर त्यापैकीच एक आहे. तथापि यामुळे अनेकदा इंटरनेटचा वेग अचानक कमी होतो किंवा कनेक्शन तुटते. असे झाल्यास राउटर बंद करून आणि रीस्टार्ट केल्याने सर्वकाही पूर्ववत होईल. एखादे डिव्हाइस रीस्टार्ट करणे खूप प्रभावी असले तरी, तुम्ही तुमचा वायफाय राउटर प्रत्यक्षात केव्हा रीस्टार्ट करावा याचा कधी विचार केला आहे का?**

### राउटर रीस्टार्ट करणे का महत्त्वाचे?

कालांतराने भरलेली कॅशे मेमरी साफ केली जाते, ज्यामुळे राउटर अधिक चांगल्या प्रकारे काम करू शकतो. यामुळे बॅकग्राउंड प्रोसेस बंद होतात, ज्यामुळे इंटरनेटचा मंद वेग आणि नेटवर्क लॅग दूर होतो. जर एखादे डिव्हाइस वायफाय कनेक्शनवरून वारंवार डिस्कनेक्ट होत असेल, तर कनेक्शन स्थिर होते. राउटर काही वेळ बंद केल्याने ओव्हर हीटमुळे होणारे नुकसान कमी होते. राउटरला एक नवीन, ताजा आयपी ॲड्रेस मिळतो, ज्यामुळे सुरक्षा आणि वेग दोन्ही सुधारतात.

### कधी आणि किती वेळा रीस्टार्ट करावे?

तुम्ही तुमचा होम राउटर महिन्यातून किमान एकदा रीस्टार्ट केला पाहिजे. राउटर हा मुळात एक छोटा संगणक असतो, ज्याची स्वतःची मेमरी आणि ऑपरेटिंग सिस्टीम असते. सततच्या वापरामुळे कॅशे मेमरी जमा होऊ शकते. एकदा रीस्टार्ट केल्याने राउटरची मेमरी साफ होते, जुन्या आणि अनावश्यक बॅकग्राउंड प्रोसेस बंद होतात आणि तुमच्या राउटरला एक नवीन सुरुवात मिळते, ज्यामुळे इंटरनेटचा वेग स्थिर राहतो.

### राउटर रीस्टार्ट कसा करावा?

तुमचा राउटर रीस्टार्ट करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे राउटरचा पॉवर प्लग भिंतीवरील सॉकेटमधून पूर्णपणे काढून टाकणे. त्यानंतर, किमान ३० सेकंद ते १ मिनिट थांबा. यामुळे राउटरमध्ये साठलेला कोणताही शिल्लक करंट पूर्णपणे निघून जाईल. जर तुम्हाला तुमचा राउटर रीस्टार्ट करायचा नसेल आणि ते आपोआप व्हावे असे वाटत असेल, तर तुम्ही ऑटोमॅटिक रीबूट शेड्यूल सुरू करू शकता. तुमचा राउटर आपोआप रीस्टार्ट होण्यासाठी तुम्ही तुमच्या राउटरच्या ॲपमध्ये किंवा सेटिंग्जमध्ये एक वेळ सेट करू शकता. रात्रीची अशी वेळ निवडा जेव्हा तुम्ही झोपलेले असाल आणि राउटर रीस्टार्ट झाल्याने तुमच्यावर कोणताही परिणाम होणार नाही.



# 'हॅलो' म्हणताच फोन डिस्कनेक्ट होतो?

## घोटाळेबाजांच्या निशाण्यावर असू शकता तुम्ही!, वाचण्यासाठी ताबडतोब बदला एक सेटिंग...

**तुमच्यासोबतही असे घडते का, की तुम्हाला एका अनोळखी नंबरवरून कॉल येतो आणि तुम्ही फोन उचलून 'हॅलो' म्हणताच तो कट होतो? जर असे वारंवार घडत असेल, तर सावध रहा. खरे तर असे कॉल्स सायलेंट स्कॅम कॉल्सचा भाग असू शकतात. गृह मंत्रालयाने याबाबत एक चेतावणी जारी केली आहे आणि सायबरदोस्त I4C ने सुद्धा लोकांना सावध करण्यासाठी X वर पोस्ट केली आहे.**

तुम्ही सायलेंट कॉल स्कॅमला फसवणुकीची सुरुवात समजू शकता. अशा कॉल्सद्वारे ऑनलाइन स्कॅमर्स कोणते नंबर सक्रिय आणि वापरात आहेत हे शोधण्याचा प्रयत्न करतात. 'हॅलो' म्हटल्याने तुम्ही स्कॅमर्सचे लक्ष्य बनता आणि तुमची कधीही फसवणूक होऊ शकते. हे टाळण्यासाठी तुम्ही तुमच्या फोनवर एक विशेष सेटिंग चालू करू शकता.




## सायलेंट कॉल स्कॅम म्हणजे काय?

सायलेंट कॉल स्कॅम हा ऑनलाइन स्कॅमर्ससाठी लक्ष्य शोधण्याचा एक मार्ग आहे. हजारो नंबरवर कॉल करण्यासाठी एका स्वयंचलित प्रणालीचा वापर केला जातो. या नंबरवर कॉल करण्याचा एकमेव उद्देश ते वापरात आहेत की नाही हे तपासणे हा असतो. मशीनला तुमचा 'हॅलो' ऐकू येताच, तुमचा नंबर सक्रिय म्हणून चिन्हांकित केला जातो.

## गृह मंत्रालयाचा काय इशारा...

गृह मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या सायबर सुरक्षा एजन्सी, I4C च्या सायबर दोस्त अकाऊंटने X वर एक इशारा पोस्ट केला आहे. सायलेंट कॉल स्कॅम कसा पुढील मोठ्या घोटाळ्याकडे नेऊ शकतो, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. जर फसवणूक करणाऱ्यांना तुमचा नंबर सक्रिय असल्याचे कळले, तर ते : तुम्हाला डिजिटल अटकेसारख्या घोटाळ्यांमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करू शकतात. तुम्हाला मिळणाऱ्या स्पॅम संदेशांची संख्या वाढू शकते. तुमची माहिती चोरण्यासाठी तुमच्यावर सायबर हल्ला होऊ शकतो.

## स्कॅम कसा टाळावा?

हा घोटाळा टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे अनोळखी नंबरवरून येणारे कॉल टाळणे. अनोळखी नंबरवर परत कॉल करू नका. आजकाल जिओ, एअरटेल आणि व्हीआय (Vi) कॉलसोबत स्पॅम अलर्ट देतात. याबद्दल जागरूक रहा आणि स्पॅम अलर्ट असलेले कॉल ब्लॉक करा. तुमच्या फोनवरील Ignore Calls From Unknown Numbers हे सेटिंग चालू करा. त्यासाठी अँड्रॉइड वापरकर्ते डायलर » सेटिंग्ज » कॉलर आयडी अँन्ड स्पॅमवर जाऊन Filter Spam Calls हे सेटिंग चालू करू शकतात. आयफोन वापरकर्ते सेटिंग्ज » फोन » स्क्रिन अननोन कॉलर » सायलेन्स निवडू शकतात. यामुळे अज्ञात नंबरवरून येणारे कॉल आपोआप सायलेंट होतील.

Shri Chatrapati Shivaji Maharaj Shikshan Sanstha's

# Shri Shankarrao Chavan Rural D.Ed College

Londhe Sangvi, Post Joshi Sangvi Osmannagar. Tq. Loha Dist. Nanded-431708
NCTE Code APW 04301/122963

## WANTED

**Non Grant - Academic Year 2026-27**

| Sr. | Designation | No. of Post | Qualificatoin |
|---|---|---|---|
| 1. | Principal | 01 | M.A., M.Ed/M.A. Edu. With 50% Marks Teaching Experience 5 Year in D.Ed College. |
| 2. | Lecturer in Perspectives in Education. | 01 | M.A., M.Ed/M.A. Edu. With 50% Marks |
| 3. | Lecturer in Science | 01 | M.Sc. M.Ed/ With 50% Marks |
| 4. | Lecturer in Math's. | 01 | M.Sc./M.Ed./With 50% Marks |
| 5. | Lecturer in Social Science & Humanities | 01 | M.A./M.Ed./M.A. Edu. With 50% Marks |
| 6. | Lecturer in Language. | 02 | M.A./M.Ed./M.A. JEdu. With 50% Marks |
| 7. | Lecturer in Fine Art And Performing Art. | 01 | M.A. Music/Dance M.D. M.A. Edu. With 50% Marks |
| 8. | Lecturer in Phy Education | 01 | M.A. M.P.ed. With 50% Marks |
| 9. | Office Superintendent | 01 | Any Gradate With MSCIT |
| 10. | Store Keeper | 01 | Any Gradate. |
| 11. | Computer Lab Assistant | 01 | B.E.A. or B.E/B.Tech |
| 12. | Librarian | 01 | M.A. M.Lib |
| 13. | Peon | 01 | SSC Pass |

- Attend Interview With Original Document Adhar Card, Pan and Photo
- Reservation As Per Govt Of Maharashtra, Policy
- Pay Scale as Per Govt of Maharashtra, Rules
- No TA/DA Will Be Paid For Attend Interview
- Interview As on 21/06/2026 At. 11.00 am as College Campus, Londhe Sangvi

**Principal**
**Shri Shankarrao Chavan**
**Rural D.Ed College Londhesangvi**
Tq. Loha Dist. Nanded

**Secretary**
**Shri Charpati Shivaji Maharaj**
**Shikshan Sanstha, Londhe Sangvi**
Tq. Loha Dist. Nanded

---

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३४६

नाव परिवर्तन वार्ड क्र. ४ मालमत्ता क्र. ३०७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मीनाक्षी मयुर अहिरवाड रा. सवना जं. ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३०७ वार्ड न. ४ ज्ञानेश्वर वामनराव रावते यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७५९/२०२६ दि. १/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट नं. ३१, पश्चिमेस - ९ मीटरचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. ३६ ची जागा, उत्तरेस -प्लॉट क्र. ३४ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

तहसिलदार तथा दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात
प्रकरण - जन्म / मृत्यू नोंद घेणे बाबत
अर्ज क्रं. ७०८/२०२६

## जाहीर प्रगटन

विषयः- जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहिर प्रगटन.

संदर्भ- अर्जदार श्री. भास्कर दादाराव शिंदे रा. नरसी ना. नायगांव (खै.) जि. नांदेड यांचा अर्ज दि. २५/०५/२०२६

ज्याअर्थी श्री. भास्कर दादाराव शिंदे रा. नरसी ता. नायगांव (खै.) जि. नांदेड यांचा अर्ज दि. २५/०५/२०२६ अर्जदार यांचा मुलगा श्रीयश भास्कर शिंदे यांचा जन्म दिनांक ३०/०१/२०११ रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय नरसी ता. नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म / मृत्यू दाखल्याचा मागणी अर्ज दिला असता संबंधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत नरसी ता. नायगांव (खै.) जि. नांदेड येथे जन्म / मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नमुना १० (अ) व १० (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि. २१/०५/२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) नुसार जन्म / मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार यांचा मुलगा श्रीयश भास्कर शिंदे यांचा जन्म दिनांक ३०/०१/२०११ जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय नरसी ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांनी जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा. अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

तहसिलदार नायगांव (खै.)
तथा तालुका दंडाधिकारी नायगांव (खै.)

---

## Change In Name

My Old Name is MOHMAD MOHSIN SHAIKH USMAN which now I am changing as New Name MOHAMMAD MOHSIN SHAIKH USMAN SHAIKH Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - SHAIKH USMAN SHAIKH
Plot No.161 Aaysha Bag Degloor Naka
Nanded Itwara Nanded Post Itwara Nanded

---

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार मोहन जगदेवराव पावडे, सुमनबाई मोहनराव पावडे, अनिकेत मोहनराव पावडे, ऋषीकेश मोहनराव पावडे, सचिन सटवाजी पावडे, गजानन आनंदराव पावडे व निखील सटवाजी पावडे, सर्व रा.. वाडी जि.नांदेड यांनी मौ. वाडी ता.जि.नांदेड गट नं. स.नं. १५१ तदनंतरचे स.नं. १५१/ब क्षेत्र ० हे. २२.५०, २२ आर, २२ आर, २२ आर, ३३.६३ आर, ११ आर, ३८.८७ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे. तेंव्हा मौ. वाडी ता.जि.नांदेड गट नं. स.नं. १५१ तदनंतरचे स.नं. १५१/ब क्षेत्र ० हे. २२.५०, २२ आर , २२ आर, २२ आर, ३३.६३ आर, ११ आर, ३८.८७ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा. विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

---

## टी. सी. हरवली

माझी नागेश भगवान शेजुळे या नावाची इयत्ता १० वी पासची टी. सी. मालेगाव रोड ते तरोडा नाका दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता-** नागेश भगवान शेजुळे रा. चिखली बु. ता. जि. नांदेड मो. ९०६७५५१०७७

---

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३४७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ अ मालमत्ता क्र. ३६२ व ३६३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, नंदकुमार दत्ता सूर्यवंशी रा. एकंबा ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३६२ व ३६३ वार्ड न. १७ अ, अब्दुल हाफीज अब्दुल खुद्दूस यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७७१/२०२६ दि. २/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस - प्लॉट नं. ४० व ४१, पश्चिमेस - कॉलनी रस्ता दक्षिणेस -प्लॉट नं. ३९ उत्तरेस -मकबुल लाईनमन यांची जमीन.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार सचिन सटवाजी पावडे, व निखील सटवाजी पावडे, सर्व रा.. वाडी, जि.नांदेड यांनी मौ. वाडी ता.जि.नांदेड गट नं. स.नं. १४८ तदनंतरचे १४८/बी क्षेत्र २९.५० आर व २९.५० आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. वाडी ता.जि.नांदेड गट नं. स.नं. १४८ तदनंतरचे १४८/ बी क्षेत्र २९.५० आर व २९.५० आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

---

## बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन:



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ सलग्नित
**श्री साईबाबा संस्थान संचलित,**
**साईबाबा कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय**
साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड.

## येथे पदवीसाठी प्रवेश देणे चालू आहे.

- **B.A** प्रथम आणि द्वितीय वर्ष
- **B.Com** प्रथम आणि द्वितीय वर्ष.
- **B.Sc** प्रथम आणि द्वितीय वर्ष (कॉम्प्युटर सायन्स)

- स्थळ -
साईबाबा महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडजवळ, हायवे रोडवर,
श्री साईबाबा मंदिरजवळ, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड

संपर्क - मो. ७५८८६३२५५०, ९२२६७२९१४७, ९०९६००९२०५, ९५२७७५७२३६.

प्राचार्य, साईबाबा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड

---

## पाहिजेत

**शासन मान्य मधुकर शिक्षण प्रसारक मंडळ किनाळा तालुका बिलोली जिल्हा नांदेड द्वारा संचलित**

## मधुकर विद्यार्थी वसतिगृह

### नरसी ता. नायगाव, जि. नांदेड

**शासनमान्य मधुकर शिक्षण प्रसारक मंडळ किनाळा ता. बिलोली जिल्हा नांदेड द्वारा संचलित मधुकर विद्यार्थी वसतीगृह नरसी तालुका नायगाव जिल्हा नांदेड या वसतिगृहावरील चौकीदार पद कै. दिलीप बाबुराव सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या झालेल्या रिक्त पदावर दिनांक १८/६/२०२६ रोजी वसतिगृह कार्यालयात नरसी येथे मुलाखत सकाळी १० ते १२ वाजता या वेळेत घ्यावयाची आहे. तरी खालील पदाकरिता पात्र उमेदवाराने आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या मूळ कागदपत्रासह हजर राहून लेखी अर्ज देऊन मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे.**

| अ. क्र. | पद | संख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | चौकीदार | ०१ | साक्षर/४ थी पास | मानधन शासन नियमाप्रमाणे |

**अधीक्षक**
**मधुकर विद्यार्थी वसतीगृह**
**ता. नायगाव, जिल्हा नांदेड**

**अध्यक्ष**
**जे. एच. गायकवाड**
**मधुकर शिक्षण प्रसारण मंडळ किनाळा,**
**ता. बिलोली जिल्हा नांदेड**

---

## Change In Name

My Old Name is SARSWATI DIGAMBER MITKE which now I am changing as New Name SAROJ VIKAS TOTAWAR Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Sign By - SAROJ VIKAS TOTAWAR
H. No.50 Tilak Nagar Nanded Near Nehru English School Post- Taroda Bk, Dist. Nanded Maharashtra-431605 Mo. No. 9326031713

---

ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली संचलित,

## शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर कला व विज्ञान महाविद्यालय

बारूळ ता. कंधार जि.नांदेड

## पाहिजेत

**ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली, ता. कंधार जि. नांदेड संचलित शांतीदूत गोविंदराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय बारूळ, ता. कंधार जि. नांदेड (कायम विनाअनुदानित) मा. सहसंचालक उच्च शिक्षण नांदेड यांचे पत्र क्र ८११ विशिसस/ उशि/ नांवि/ अनू-२/२०२४-२५ दि. १९/०५/२०२५ रोजीच्या ना हरकत प्रमाणपत्रानूसार पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जागा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या नियमाप्रमाणे भरावयाच्या आहेत. इच्छुक उमेदवारांनी दि. १४/०६/२०२६ रविवार रोजी ठीक सकाळी ११ वाजता साईबाबा महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता.जि.नांदेड येथे अर्ज व आवश्यक त्या कागदपत्राच्या मुळ व छायांकीत प्रतिसह थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.**

| पद | विषय | पद-संख्या | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|---|---|
| प्राचार्य | - | ०१ | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. (१५ वर्ष अध्यापनाचा अनूभव) | अराखीव |
| सहा. प्राध्यापक | भूगोल | ०१ | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. | खुला-०२ अनू-जाती-०१, वि.जा. (अ)-०१, इ.मा.व.-०१, सा.शै.मा.प्र-०१ |
| सहा. प्राध्यापक | शा.शि. संचालक | ०१ | एम.पी.एड. नेट/सेट/पीएच.डी | |
| सहा.प्राध्यापक | रसायनशास्त्र | ०१ | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. | |
| सहा. प्राध्यापक | भौतिकशास्त्र | ०१ | एम.ए./एम.एसी नेट/सेट/पीएच.डी. | |
| सहा. प्राध्यापक | संगणकशास्त्र | ०१ | एम.एसी, एम.सी.ए.नेट/सेट/पीएच.डी. | |
| सहा. प्राध्यापक | ग्रंथपाल | ०१ | एम.लिब, नेट/सेट/पीएच.डी. | |
| मुख्य लिपीक | - | ०१ | पदवीधर - टाईप, संगणक | अराखीव |
| वरिष्ठ लिपीक | - | ०१ | पदवीधर - टाईप, संगणक | अराखीव |
| कनिष्ठ लिपीक | - | ०१ | पदवीधर - टाईप, संगणक | अराखीव |
| प्रयोगशाळा सहाय्यक | - | ०१ | १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण | अराखीव |
| ग्रंथालय परिचर | - | ०१ | १० वी उत्तीर्ण | खुला-०३ अनु.जाती-०१, अनु. जमाती-०१, वि.जा.अ.-०१,इ.मा.व.-०१, सा.शै.मा.प्र-०१,आ.दु.घ.०१ |
| प्रयोगशाळा परिचर | - | ०४ | १० वी उत्तीर्ण | |
| शिपाई | - | ०४ | १० वी उत्तीर्ण | |

टिप : १. विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.
२. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्व:खर्चाने कोणतेही भाडे अथवा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

**संपर्क - मो. ९५५२७२२७२१**

**ग्राम विकास शिक्षण सचिव, संस्था चिखली, ता. कंधार जि. नांदेड**

---

## पाहिजेत



**श्री. साईबाबा संस्थान, साईनगर, धनगरवाडी, ता.जि.नांदेड संचलित**

## साईबाबा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धनगरवाडी ता. जि. नांदेड

**साईबाबा (कला वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, धनगरवाडी, ता.जि.नांदेड (कायम विनाअनुदानित) महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या जागा इच्छुक उमेदवारांनी दि १४/०६/२०२६ रोजी रविवारी सकाळी ११:०० वाजता मुळ व छायांकीत प्रतिसह, साईबाबा महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता.जि.नांदेड (saibabamvsd2025@gmail.com) येथे थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.**

| विषय | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|
| प्राचार्य | एम.ए./एम.एसी/एम.कॉम नेट/सेट/पी एच.डी. (१५ वर्ष अध्यापनाचा अनूभव) | अराखीव. |
| अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल. | एम.ए., नेट/सेट/ पी एच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | U.G.C च्या नियमा प्रमाने लागू होईल. खुला, अनु जाती, अनु जमाती, वि.जा.अ., इ.मा.व., सा.शै.मा.प्र., विकलांग रिक्त पदा प्रमाने निवड करण्यात यईल. |
| मराठी इंग्रजी/ हिंदी. | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | |
| संगनकशास्त्र, सूक्ष्मजीवनशास्त्र प्राणीशास्त्र, वनस्पतिशास्त्र, गणित. | एम.एसी.एम.सी.ए.नेट/सेट/पी एच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | |
| वाणीज्य. | एम.कॉम. नेट/सेट/पीएच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | |
| प्रयोगशाळा सहाय्यक, लिपीक. शिपाई. | B-LIB/१२ वी (विज्ञान) १० वी. | पदसंख्या प्रत्यकी (०१) |

टिपः
१. विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.
२. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्व:खर्चाने कोणतेही भाडे अथवा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

**संपर्क मो. ७५८८६३२५५०/९२२६७२९१४७.**

**सचिव, श्री साईबाबा संस्थान, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस
महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# एमआयडीसी मुख्य मार्गावरील व अंतर्गत भागातील अनेक अतिक्रमणे जेसीबीच्या सहाय्याने उद्ध्वस्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने सिडको-लगत असलेल्या एम.आय.डी.सी. मधील रस्त्याच्या बाजूला पानटपरी, हॉटेल व ईतर व्यवसाय उभारून अनेकांनी अतिक्रमण केले. हे अतिक्रमण काढण्यात येणार असून प्रादेशिक परिवहन कार्यालय समोरील अनेक अतिक्रमणे काढण्यात आली. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त होता.



सिडको परिसरालगत असलेल्या औद्योगिक वसाहत कार्यालयाच्या वतीने परिसरातील रस्त्यालगत असलेले अतिक्रमण हटाव मोहीम प्रादेशिक अधिकारी राजाराम गुठले, उपरचनाकार चव्हाण, कार्यकारी अभियंता जावेद, क्षेत्रीय व्यवस्थापक गजानन कपाळे, सौ. सुरेखा फड, श्रीकांत तमखाने, संदीप देशमुख यांच्यासह कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत प्रादेशिक परिवहन कार्यालय समोरील पानटपरी, हॉटेल व जागेवर केलेले जवळपास अनेक अतिक्रमणं जेसीबी सहायाने काढून टाकण्यात आले.

यावेळी संबंधित अतिक्रमण-धारक, अधिकारी, कर्मचारी व पोलीस यांच्यासोबत काही वेळ वादविवाद झाला होता. आमच्या कुटुंबातील सदस्यांसाठी हा व्यवसाय उदरनिर्वाह असल्याने आम्हाला वेळ द्या, अशी मागणी काही जणांनी केली, परंतु याबाबत जवळपास पंधरा दिवसांपूर्वी तोंडी सूचना दिल्याचे सांगण्यात आले होते, असे सांगून पुन्हा मोहीम चालू ठेवली.

पोलिसांनी संबंधिताना सांगितल्यानंतर पुन्हा अतिक्रमण मोहीम हाती घेण्यात आली तर अतिक्रमण मोहीम येण्यापूर्वी उस्मानगर रोडवरील अतिक्रमण-धारकांनी स्वतःहुन पानटपरी, हॉटेल आदी अतिक्रमण काढून घेतले आहे. ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, भालेराव यांच्यासह महिला पोलीस, पोलीस कर्मचारी यांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या तीन दिवसीय मोहिमेमुळे औद्योगिक वसाहतीतील मुख्य मार्गावरील व अंतर्गत रोडवरील अतिक्रमणे निघणार आहेत, यामुळे संबंधित भूखंडधारक व अनेक व्यावसायिकधारकांना दिलासा मिळाला आहे.

# वर्ल्ड योगा चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक विजेता श्रेयस मार्कंडेयचा नांदेड जिल्हा प्रशासनाकडून गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** अहमदाबाद येथे आयोजित वर्ल्ड योगा चॅम्पियनशिप २०२६ मध्ये नांदेड येथील श्रेयस मार्कंडेय यांनी प्रथम क्रमांक पटकावत. सुवर्णपदक मिळविणाऱ्या जिल्हा प्रशासन नांदेड व जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयात सत्कार करण्यात आला.



यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, श्रेयसचे आई, वडील, विविध योग समितीचे योगाचारी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी श्रेयस मार्कंडेय यांचे अभिनंदन करताना सांगितले की, जिद्द, समर्पण, सातत्यपूर्ण सराव आणि उत्कृष्ट योग कौशल्याच्या बळावर त्यांनी भारतासह महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे.

श्रेयस मार्कंडेय यांनी कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे अनेक युवा योगसाधकांना नवी प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या भविष्यातील वाटचालीसही नवी दिशा मिळेल, असा विश्वास निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी यावेळी व्यक्त केला.

जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने श्रेयस मार्कंडेय यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# उन्हाची तीव्रता लक्षात घेता उन्हाळी सुट्ट्या एक आठवड्याने वाढवाव्यात

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची जिल्हा प्रशासनाकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यातील असह्य तापमान व वाढती उष्णता तसेच ग्रामीण भागात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे विदर्भाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून मराठवाड्यातील शाळा एका आठवड्याने उशिरा चालू करण्यात याव्यात, अशी मागणी म. रा. शिक्षक परिषदेने केली.



मराठवाड्यातील शाळा दि. १५ जूनपासून चालू करण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु तीव्र उष्णतेमुळे शालेय विद्यार्थ्यांना उष्माघाताची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने अतिरिक्त जिल्हाधिकारी किरण आंबेकर व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली तसेच शिक्षणाधिकारी (प्रा.) वंदना फुटाणे यांच्याकडे शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेट घेऊन मागणी केली. सुट्टीच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन शिष्टमंडळास दिले.

यावेळी शिष्टमंडळात राज्यप्रवक्ते दत्तप्रसाद पांडागळे, जिल्हानेते संभाजी आलेवाड, जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड, जिल्हा कार्यवाह प्रल्हाद राठोड, जिल्हा कार्याध्यक्ष बालाजी पाम्पटवार, जिल्हा कार्याध्यक्ष शिवशंकर बोडके, सुनिल मुत्तेपवार, प्रसिद्धी प्रमुख विठ्ठल मुखेडकर, बिलोली तालुका उपाध्यक्ष दिगंबर राजबोईनवाड आदी उपस्थित होते.

# ग्राहकांच्या शोषणाला आळा घालण्यासाठी एम.आर.पी. व्यवस्थेत सुधारणा करा

## अ.भा. ग्राहक पंचायत नांदेड शाखेच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** बाजार-पेठेत लागू असलेली कमाल किरकोळ विक्री मूल्य (एम.आर.पी.) व्यवस्था ग्राहकांच्या संरक्षणाऐवजी त्यांच्या आर्थिक शोषणाचे साधन बनत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतने केंद्र सरकारकडे कायद्यात तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे. या संदर्भातील सविस्तर निवेदन पंतप्रधान, केंद्रीय वित्तमंत्री आणि ग्राहक व्यवहार मंत्र्यांच्या नावे नांदेड जिल्हा शाखेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्याकडे सादर करण्यात आले.



निवेदन सादर करताना अ. भा. ग्राहक पंचायतचे नांदेड शाखेचे जिल्हाध्यक्ष रमेश मस्के, जिल्हा सचिव संतोष कुलकर्णी, सहसचिव अनुजा डोईफोडे, ग्राहक मार्गदर्शन प्रमुख रश्मी वडवळकर, जयंत वाकोडकर, उत्तम कुंटूरकर, भगवान पवार आणि विजय पाठक उपस्थित होते.

ग्राहक पंचायतच्या म्हणण्यानुसार एम.आर.पी. व्यवस्था ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आली होती. मात्र सध्या उत्पादक कंपन्यांकडून कोणत्याही ठोस कायदेशीर मर्यादेशिवाय वस्तूंवर अवाजवी आणि फुगवलेल्या किमती छापल्या जात आहेत. त्यानंतर मोठ्या सवलतींचे आमिष दाखवून ग्राहकांची दिशाभूल केली जात असून, या प्रक्रियेत ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

# रमणाबाई राठोड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मूळच्या कर्नाटक राज्यातील जमगी तांडा



(बी) तालुका औराद, बिदर येथील रमणाबाई मारुती राठोड (जहागीरदार) यांचे ९८ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जमगी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सात मुली, सून, नातू, पणतू, जावई असा परिवार आहे. लोहा तालुक्यातील रामदास तांडा येथील बंजारा हस्तशिल्प राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या मुक्ताबाई पवार यांच्या त्या मोठ्या भगिनी होत.

# मास रेड : अवैध धंद्यांविरूद्ध पोलिसांची कारवाई; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर आळा घालण्यासाठी नांदेड पोलिसांनी 'ऑपरेशन क्रॅकडाऊन' अंतर्गत विशेष मोहीम राबवत अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री, जुगार तसेच गोवंश वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध व्यापक कारवाई केली. या मोहिमेत ४९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ५३ आरोपींवर कारवाई करीत एकूण ७ लाख ८८ हजार ८८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार ११ जून २०२६ रोजी जिल्हाभर एकाच वेळी 'मास रेड' टाकण्यात आली. या कारवाईत अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील (भोकर) आणि सुरज गुरव (नांदेड) यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि अंमलदार सहभागी झाले होते. मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी छापे टाकून अवैध दारू विक्री, हातभट्टी दारू निर्मिती, जुगार अड्डे आणि गोवंश वाहतुकीशी संबंधित बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी संबंधित ठिकाणांवर धाड टाकून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने ही मोहीम प्रभावी ठरल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच अवैध व्यवसायांना पूर्णतः आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



**नांदेड –** युवासेना जिल्हाप्रमुख पै. विठ्ठल बाळू पाटील मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त हभप सुधीर महाराज पळशीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करून विविध कार्यक्रम घेत वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. आनंदराव बोंढारकर, मोतीराम पाटील मोरे, जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, सहसंपर्क प्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, शहरप्रमुख सुहास खराणे, तालुकाप्रमुख अशोक मोरे, श्याम पाटील वानखेडे, सचिन पवार, दीपक स्वामी, अक्षय रावत, महेश तिडके, स्वराज यादव, ओमप्रकाश धुप्पेकर, आदित्य पाटील मोरे, अनिकेत पाटील मोरे, विनय पाटील मोरे आदी दिसत आहेत. (छाया: करणसिंह बैस)

# निखिल कन्स्ट्रक्शनच्या भोंगळ कारभाराने गेला वॉचमनचा बळी

## राष्ट्रीय महामार्ग ६१ बनला मृत्यूचा सापळा; बांधकाम विभागाचे संशयास्पद मौन



**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर-बारसगाव ते भोकर-रहाटी (तेलंगणा सीमा) या राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या कामात 'निखिल कन्स्ट्रक्शन'ने केलेल्या प्रचंड दिरंगाईचा आणि भोंगळ कारभाराचा आणखी एक बळी गेला आहे. १० जून २०२६ रोजी रात्री ९:०० च्या सुमारास महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवर कामाच्या ठिकाणी असलेल्या वॉचमनचा भीषण अपघातात मृत्यू झाला.

रस्ते कामाच्या ठिकाणी कोणतेही दिशादर्शक फलक किंवा सुरक्षेचे उपाय योजले नसल्याने हा जीवघेणा अपघात घडला. या घटनेनंतर कंपनीने पीडित कुटुंबाला ५ लाख रुपयांची मदत देऊन कारवाई टाळण्याचा प्रयत्न केला असून, बांधकाम विभाग मात्र दोन दिवस उलटूनही मूग गिळून गप्प आहे. १० जून रोजी रात्री ९ च्या सुमारास तेलंगणा सीमेजवळ निखिल कन्स्ट्रक्शनचे काम सुरू होते. यावेळी गणपत मोठेकर रा. कांडली आणि त्यांच्यासोबत असलेला आणखी एक वॉचमन तिथे उपस्थित होते. या अपघातात गणपत मोठेकर यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्यांच्यासोबत असलेला दुसरा वॉचमन थोडक्यात बचावला असून, तो गंभीर जखमी आहे. कंपनीने कामाच्या ठिकाणी कोणतेही 'रेडियम बोर्ड' किंवा दिशादर्शक फलक लावले नसल्याने भोकरकडून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकचालकाला कामाचा अंदाज आला नाही. ट्रक क्रमांक एमएच १२ एन एक्स ०९०३ हा थेट काम सुरू असलेल्या मशिनवर जाऊन आदळला आणि ती मशीन अंगावर पडल्याने हा अपघात घडला.

# येळी घाटावर अवैध वाळू उपसा करणाऱ्या यंत्रसामुग्रीसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त; उस्माननगर पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून क्रॅकडाऊन ऑपरेशन अंतर्गत उस्माननगर ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महेश मुळी यांनी आपल्या पथकाला सोबत घेऊन लोहा तालुक्यातील येळी घाटावर कारवाई केली. यावेळी अवैध वाळू उपसा करणारी यंत्रसामुग्री व वाळूचा साठा जप्त करून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ११ जूनच्या सायंकाळी चारच्या सुमारास करण्यात आली.



उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळूची चोरटी वाहतूक व विक्री करणारे चालक व मालक या लोकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने सपोनि महेश मुळीक यांनी आपल्या पथकासह हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहिती मिळाली की, येळी ता. लोहा जि. नांदेड येथील गोदावरी नदीचे पात्रातून बोटीच्या सहाय्याने अवैधरित्या चोरून वाळू उत्खनन करून साठा करीत आहेत. या माहितीवरुन नमूद पथकासह सदर ठिकाणी छापा कारवाई केली असता येळी शिवारातील आनंदा नारायण ढगे यांच्या शेताजवळील गोदावरी नदीचे काठावर वाळू साठा केलेला व गोदावरी नदीचे पात्रात दोन मोठ्या लोखंडी बोट फायबर व एक छोटे इंजिन, लोखंडी बोट आढळून आले. बोटीवर वाळू उपसा करणारे पोलीस पथकास पाहून पळून गेले. त्यानंतर सपोनि महेश मुळीक यांनी ग्राम महसूल अधिकारी यांना संपर्क साधला असता लोखंडी बोटीच्या सहाय्याने वाळू उपसा करण्यास कार्यालयातून कोणालाही परवानगी दिलेली नाही, याबाबत माहिती दिली.

सदरील वाळू साठा अवैधरित्या उपसा करत आहेत अशी खात्री झाल्याने महसूलचे अधिकारी यांना घटनास्थळावर बोलावून ग्राम महसूल अधिकारी मोतीराम पवार व नेताजी रायाजी यांनी तसा रितसर पंचनामा पंचासमक्ष करुन दिल्याने वरील प्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच काही मुद्देमाल हा जाग्यावरून हलविणे अवघड असल्याने महसूल प्रशासनाचे अधिकारी यांनी वर नमूद दोन मोठ्या लोखंडी बोट, फायबर व एक छोटे इंजीन लोखंडी बोट ह्या जिलेटीनच्या सहाय्याने स्फोट करून जागीच नष्ट केल्या आहेत. त्यानंतर बोट मालकांची माहिती घेवून फिर्यादी पोलीस हवालदार बजरंग कलेवार यांचे फिर्यादीवरून दिनेश दशरथ गाडे आणि विश्वनाथ साईनाथ आंबेकर यांच्याविरूध्द पोलीस स्टेशन उस्माननगर येथे नमूद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com